
# कार्तिक हजारे



# काही राहून गेलं होतं

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# काही राहून गेलं होतं

(लघुकादंबरी)

लेखक : कार्तिक गुलाब हजारे

# काही राहून गेलं होतं

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# काही राहून गेलं होतं

लेखक : कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

इ मेल... karthikhajare@gmail. com

फेसबुक... https//www. facebook. com... Karthik hajare

पत्ता... मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३.. मींथूर् पोस्ट - नवेगाव (पांडव). तालुका - नागभिड जिल्हा – चंद्रपूर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २९ ऑक्टोबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखकाचा परिचय



वाचनाची सवय मला तशी लहानपणापासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी एक वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचू शकतो याची प्रचिती मला नेहमी सुखदेवे सर द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने  शाळेतील कित्येक सांस्कृतिक कार्यक्रमात माझी आवर्जून निवड व्हायची. कालांतराने काही आर्थिक परिस्थितीमुळे माझी शाळा सुटली. अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड ही कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो. जेव्हा तेही बंद झाले तेव्हा माझी आवड मिटत गेली. गेली ८ वर्षे मी नुसता कामाच्या बाबतीत लेखनाला दूर ठेवलं. पण परत कुणाच्यातरी आठवणीत मी बेधुंद लहरीतून माझ्या कविता आणि लेख प्रकाशित करू लागलो.

माझे आवडते लेखक सुहास शिरवळकर यांच्या कित्येक कादंबरीतून पात्रांची, भावनांची विचारसरणी मी मनावर घेतली आणि परत लिहायला लागलो.

माझं पहिलं पुस्तक प्रेमाचं अस्तित्व याला आपल्याकडून अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. आता माझे दुसरे पुस्तक “काही राहून गेलं होतं” मांडताना मला अत्यंत हर्ष होत आहे. आणि ते वाचून झाल्यावर मला आनंदाने तुमचा प्रतिसाद कळवा. जेणे करून मी लवकरात लवकर तुमच्यापाशी नवीन पुस्तक घेऊन येईन.

# मनोगत

प्रिय रसिक वाचकांनो....

सर्वप्रथम मी तुम्हा सगळ्यांचे आभार मानतो. प्रेमाचं अस्तित्व..या माझ्या पहिल्या लघुकादंबरीला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाल्यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे.पहिल्यांदा माझ्या लेखनासाठी कुणीतरी मला मेल,एसएमएस किंवा कॉल करत आहेत.हे सगळं अनपेक्षित असलं तरी माझ्यासाठी हे प्रथमच होतं.कित्येकांनी पुढील पुस्तकांसाठी शुभेच्छा पाठवल्या होत्या.

पुस्तकी विश्व म्हणजे शब्दांची उत्तम जदुगिरी.कारण तीच शब्द आपल्याला हसवतात,रडवतात आणि भावनांचा कल्लोळ करून विचारसुद्धा करायला लावतात..त्यामुळे लेखकापेक्षा आज वाचकांची संख्या जरा वाढत चालली.अलीकडे मी pk production house असं युट्यूबवर चॅनल ओपन केलंय.ज्यामध्ये काही कवितांचे ब्लॉग्स किंवा शॉर्ट चित्रफीत असते.

मी श्री.सुनील सामंत यांचे आभार मानतो..ज्यांनी ई साहित्य मध्ये मला काम करण्याची सुवर्ण संधी दिली...आणि लवकरच पेरजागढ...एक रहस्य ही पुस्तक आपणा सर्वांच्या जवळ येईल अशी मी आशा बाळगतो..आणि उत्सुक वाचकांसाठी आवडेल या अपेक्षेने...

काही राहून गेलं होतं.......



**अर्पण पत्रिका...**

माझ्या वास्तव्याला सामोर आणणाऱ्या माझ्या आईवडिलांस तथा वेळोवेळी मला मदत करणाऱ्या माझ्या बहिण भावांस तथा माझ्या मित्र मैत्रिणीस समर्पित


कार्तिक हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

इ मेल... karthikhajare@gmail. com

पत्ता... मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३..

मींथूर्   पोस्ट - नवेगाव (पांडव).

तालुका - नागभिड

जिल्हा - चंद्रपूर

या कथेतील सर्व व्यक्तींची कल्पना, आणि घटना सर्व काल्पनिक आहे. थोडीफार स्थळांशी साम्य असलं तरी ते तेव्हढ्या पुरतीच असून त्याचं सत्याशी काहीही वास्तव्य नाही. असल्यास तो फक्त योगायोग असावा.

# काही राहून गेलं होतं!!!

## १) परत ती सामोरी

शेखर...

( कोण म्हणत मागे मान वळवली. )

शेवटचं लग्न म्हणून मावशिपण आल्या होत्या. आणि आता फार वयस्कर पण झाल्या होत्या.

अरे... मावशी... तुम्हीपण इथे कार्यक्रमात आहात... मग दिसले नाहीत ना..

अरे मी तिकडे स्टेजवर होते. गर्दीत बघताना तू दिसलास.. म्हणून आले.. कारण हल्ली आता तू सगळयांपासून वेगळं राहायला शिकलास वाटतं..

ह... तसं काही नाही... उगाच वर्दळ नको म्हणून इथे एकांतात आलो.

कुठे असतोस रे आता? लग्न वगैरे केलं की नाही?

मी नागपूरला असतो. तिथेच इंजिनिअर आहे. आणि लग्नाविषयी मला कुठलीही इच्छा नाही. मी असाच बरा...

हात टेकले बाबा तुझ्यापुढे... तुझं शेवटचं लग्न पाहून मोकळं व्हायला आली होती मी. पण तू तर अधाशीच ठेवणार बहुतेक...

तसं काही होणार नाही मावशी. बाकी काय चाललंय?.. तुमचं सांगा ना...

विषय टाळतो आहेस शेखर!

जाऊ द्यात ना मावशी त्या गोष्टी. (आणि मावशीची नजर मोडून मी इकडे तिकडे बघू लागलो. )तितक्यात मावशीला कुणाच्यातरी बोलावण्याची हाक ऐकू आली.

ओ.. आत्या..

( दोघेही आवाजाच्या दिशेने बघू लागलो. )

पदर सावरताना समोर आलेले केस मागे करायच्या नादात तिचा चेहरा मला दिसला. आणि तो चेहरा बघून मी जागीच स्तब्ध झालो. एकदम दहा वर्षांपूर्वी झालेली गोष्ट आठवली. तिची फारशी लक्ष पडू न देता हळूच मावशीला येतो म्हणून घाईघाईने मंडपाच्या बाहेर आलो. मन अजून अजून बेचैन होत होते.

कार जवळ आलो. दार उघडून पाण्याची बॉटल बाहेर काढली आणि दोन घुट घश्यात ओतले. गाडीत बसून थोडा वेळ एसी चालू केला आणि विचार आलं

ती आज इतक्या दिवसांनी?पण इथे कशाला आली असेल? इथे तिचे कोण असतील?

लग्नाचं इन्विटेशन पत्रिका काढली आणि बघू लागलो. त्यात तिचा मात्र कुठेच उल्लेख नव्हता. आणि हे काय? ती साडीवर होती. पण मला तिच्या गळयात मंगळसूत्र दिसला नाही. तिने लग्न तर केलं नसेल ना?

मनात काहीसे कुतूहल प्रश्न मनात धरून कारच्या बाहेर निघालो. चेहऱ्याला थोडाफार लपवण्यासाठी मुसका बांधण्याचा प्रयत्न केला. एव्हाना लग्न समारंभ झालं होतं. फक्त स्टेजवर शुभेच्छा तेव्हढ्या द्यायच्या बाकी होत्या. लग्न म्हणजे माझ्या सगळ्यात लहान मावस बहिणींचं होतं... स्टेजवर जाताना इकडे तिकडे नजर फिरवली. कुठेही ती दिसली नाही. हातातलं बुके नवरीच्या वेष्यात असलेल्या बहिणीला दिलं आणि शुभेच्छा कळवले. एक फोटोशूट घेऊन परत मी मावशीच्या शोधार्थ निघून गेलो.

दूर कोपऱ्यात आपल्या चार मैत्रिणीशी गप्पा मारत ती बसली होती. तिला ऐकु जायला हवं म्हणून थोड्या जोरानेच तिला हाक मारली

मावशी...

आवाज ऐकताच ती जवळ आली.
काय रे काय झालं?

आपण बोलत असताना मघाशी तुम्हाला बोलावलं ती कोण होती?

अरे ती स्मिताची चांगली मैत्रीण आहे. गेली दोन वर्षे छान मैत्री आहे त्यांची. तिच्या बरोबरच मार्केटिंग करत असते. बघ ना मैत्री म्हणून ती आठ दिवसांच्या आधीच आली. आणि एक तू आहेस घरचा सख्खा असून सुद्धा असं आज येतो आहेस. तेही ऐन कार्यक्रमावर...

मी अजून काही विचारलं असतं. पण उगाच मावशीला संशय नको म्हणून गप्प राहिलो. तितक्यात दादी दादी करत एक ७_८ वर्षाचा मुलगा आला. आणि मावशीला पैसे मागू लागला. तिच्याकडे चिल्लर पैसे नव्हते म्हणून ती चिल्लर बघायला बाजूला गेली.

त्या गोंडस मुलाला पाहून मला आपलेपणा जाणवत होता. न राहवून त्याला मी जवळ बोलावलं आणि हळूच त्याच्या केसांवरून हात फिरवत त्याला विचारलं.

काय नाव बेटा तुझं?

माझं नाव प्रतीक.

दादीला कश्याला पैसे मागतो... आईसक्रीम खायला

हो...

चल बेटा मी तुला घेऊन देतो..

त्याचं प्रतीक नाव ऐकताच मनाला एक दुखःद आठवण आली. त्याच्या निरागस पणाकडे बघत असताना वाटत होतं. आज माझ्याही मुलाचा प्रतीक हा नाव असता. पण दुर्दैव म्हणत त्या मुलाकडे बघून आनंद व्यक्त करत होतो. तेव्हढ्यात मम्मी मम्मी करत धावत धावत तो माझ्या मागे गेला.

कुणाला त्रास नाही ना दिला.. असे म्हणत तिने त्याची जोरदार एक पप्पी घेतली. क्षणभर कोण आहे म्हणून मी मागे वळून बघितलं आणि तिची अन् माझी नजरानजर झाली. क्षणभर मी प्रतीककडे आणि क्षणभर तिच्याकडे बघू लागलो. प्रतीक फक्त तिला एवढेच सांगत होता की यांनीच मला आईसक्रीम घेऊन दिली म्हणून. आणि ती त्याला छातीशी कवटाळत होती.

कधी वाटलं सुद्धा नाही की ती मला अशी मिळेल. इतके वेळ एकमेकांना बघत असूनही कुणाचीच बोलण्याची हिम्मत होत नव्हती. सगळं कसं स्तब्ध झाल्यासारखं वाटत होतं. हळूच डोळयांच्या काठावरून ओल्याश्यार पाण्याची वाही केव्हा शुरू झाली काही कळलंच नाही. पण ते पुसण्याचे त्रानही कुठे उरले होते तेव्हा.

आठवल्या त्या शपथा आणि दिसले ते निरनिराळे मार्ग. शेवटी नजर तोडून पहिलं पाऊल मीच टाकलं... थेट  मंडपाच्या बाहेर.

कार चालू केली. आणि परत मंडपाकडे न बघता निघालो. एक वेळ अशी होती की तिच्या गळयात मंगळसूत्र नाही हे बघून मला थोडं फार हर्ष झाला होता. आणि आता तिला आठ वर्षाचा एक मुलगा आहे म्हणून दुःख. आज माझाच मुलगा असता तर तर १० वर्षाचा झाला झाला असता.

भूतकाळाचे पान आपोआप पालटत होते. बोलावं तिच्याशी इतकं सगळं झाल्यावरही. घडलेल्या काळावर माती टाकून नव्याने फुलोरा द्यावा. पण काय करू?पण तेव्हाही माझी हिंमतच झाली नाही. जशी तिला विचारायला होत नव्हती.

## २). तिची पहिली भेट आणि मित्रांची सभा...

तिचा ओझरता रूप बघून मलाच निस्तरायला झालं होतं. परतीचा एक पाऊल मागे टाकून मावशी थांब रे म्हणत असतानाही मी समोर पाऊल टाकला. थेट गाडी थांबवली ती अर्ध्या निर्जन रस्त्यात.

गाडीतून उतरलो... रस्त्याच्याकडेला जाऊन थोडं फ्रेश होण्याचा प्रयत्न करत होतो. परंतु तिचा चेहराच आड येत होता. का ती अशी एकाएकी माझ्या समोर आली असेल?

तिनेच म्हटलं होतं ना... तुझ्या डोळयाला दिसणार नाही म्हणून.. मग हे काय?

हे योगायोग तर नाही असू शकत आणि परत आकर्षण व्हायला आता काहीच आमच्यात उरलं नव्हतं. इतका दुरावा कशी काय झेपवू शकते ती?आजपर्यंत घडलेल्या गोष्टी मी नाही विसरू शकलो. आणि ती चक्क खुश आहे. आज आमच्यात अंतर येवून १० वर्षे लोटून गेली. आणि लग्न मंडप सोडून मी तिचा या निर्जन अर्ध रस्त्यावर विचार करतोय.

शेवटी झालं काय होतं... १० वर्षाूर्वी...

आठवली ती सकाळ. केस विंचरले आणि सायकलवर टांग टाकून निघालो. सगळ्या मित्रांची भेट घ्यायला. पण सगळयांची भेट घ्यायच्या अगोदर माझा एक विरंगुळा होता. तेच ते ज्याला आपण आपल्या भाषेत एकतर्फी प्रेम म्हणतो.

रोज तिच्या घरासमोर टपरीवर जाऊन बसायचं. ती कधी गॅलरीत येऊन केस विंचरताना दिसायची तर कधी पोपटांना चारा टाकत असायची. कोणत्या ना कोणत्या कारणांनी मला तिला बघणे सुखावह वाटत होते. एक वेगळाच आनंद मिळायचा. माझ्या दिवसाची शुरुवात म्हणजे ती होती.

माझं म्हणजे एकदम खरं प्रेम होतं तिच्यावर. पण कधीच मला तिला काही विचारण्याचा प्रश्न आला नाही. आणि तशीही कॉलेजमध्ये ती मला सीनिअर होतीच. जेव्हा मित्रांबरोबर ट्रीपवरून येताना पहिल्यांदा त्या टपरीवर आलो होतो. तेव्हा पहिल्यांदा मी तिला बघितलं होतं.

दरवाज्यासमोर पायरीवर बसून आपल्या ओल्याशार केसांना सावरत होती. का कुणास ठावूक? समोर दर्पण असूनही नजर कसल्यातरी तंद्रीत दूरवर पसरली होती. नाजूक अश्या ओठांवर काळीज घायाळ करणारे स्मित पसरत होते. हळूच कश्याची तरी आठवण व्हावी आणि आपणच मनात खुदकन हसावं अशी ती वेडी त्याचं क्षणाला माझ्या मनी भावली होती. तिचं ते निरागस साैंदर्य असं हृदयात रेखाटलं होतं. तिच्या त्या वेडा मुळे माझं रोज तिथं जाणं येणं ठरलं होतं.

कित्येकदा यायचं मनात एकदातरी तिच्याशी बोलावं. पण काय बोलणार हा प्रश्न मनाला सतावत होता. त्यामुळे खरं सांगून तिला विसरण्यापेक्षा. तिला रोज बघून मनाची आकांक्षा पूर्ण करीत होतो.

सगळं काही सुरळीत चाललं होतं. रोज तिला बघून नवा दिवस, नवी उमेद, नवा उत्साह बाळगत होतो. पण म्हणतात ना जगात लपवण्यासारखी अशी कोणतीच गोष्ट नाही. तसच

माझ्याही बाबतीत झालं. मित्रांना माहीत झालं आणि सगळ्यांनी मिळून माझी हजेरी घेतली. सगळे एकावर एक सल्ले देवू लागले. कुणी लव्ह गुरु बनून, तर कुणी बुजुर्ग म्हणून, तर कुणी मित्र म्हणून. अगदी काहीजण तर डेमोच दाखवू लागले.

पण प्रेम ही कोणती वस्तू नसते. जीला जिंकता येईल. प्रेम ही एक निरागस भावना असते. ती मनातून उठवावी लागते. डोळयांवर तिचे भाव आणावे लागतात. ओठांनी आस्वाद घ्यावा लागतो. आणि आयुष्यभर जिच्या सहवासात मला माझं अख्खं आयुष्य जगायचं आहे. तिचं प्रेम मला असं सहजा सहजी मिळणार नव्हतं. कारण जे योगायोगाने घडते. शेवटी त्यालाच तर प्रेम म्हणतात. आणि माझ्या बाबतीत असा कुठलाच योग नव्हता.

कॉलेजमध्ये फार वर्दळ वाटायची. पण तिचं शेवटचं वर्ष आणि वर सीनिअर असल्यामुळे साधं हाय करायला सुद्धा भीती वाटत होती. कॉलेजला लागून एक हॉटेल होता. आम्ही सगळे तिथंच जमा व्हायचो. रोज भव्य पार्टी व्हायची आमची. त्या हॉटेलला आम्ही अन्नपूर्णा म्हणायचो. कारण त्या हॉटेल मालकाला तेच नाव शोभायचा.

अमित, सूनैना, आशा, दिग्या आणि जो असं आमचं ग्रुप रोज बसायचं. आज जरा कारण वेगळंच होतं. सगळ्यांनी मिळून तिची डिटेल आणली होती. मित्र असण्याचा त्यांनी पुरेपूर काम केलं होतं. आणि सगळे माझ्या चेहऱ्यावर असणाऱ्या आशंकेसाठी टक लावून बघत होते. जणू मी तिच्यासाठी ठार वेडा तर नाही.

शेवटी सुनैना म्हणाली..

नाव_ मयुरी गायकवाड. वडील पुण्यात डॉक्टर आहेत. आईजवळ एकटीच असते. तिला लाल रंग आवडतो. आईसक्रीम खायला आवडते. तिला कुणाशी बोलणे किंवा मैत्री करणे अजिबात आवडत नाही.

एक खरं सांगू का तुला. तिला कुणीही मैत्रीण नाही. तिच्या आयुष्यात दोनच गोष्टी महत्त्वाच्या त्या म्हणजे तिचा स्वत्व आणि तोच तिचा विश्व. तिला कुणाचीच भीती नाही. मागे एका मुलाने प्रपोज केलं होतं... आशा म्हणाली.

त्याचं काय झालं?अमितने विचारले.

तुरुंगात आहे तो... आशा म्हणाली.

च्यायला भारीच आहे की... दिग्या म्हणाला..

आणि हा म्हणे तिच्यावर प्रेम करतो!शेवटी जो म्हणाला.

बघ रे बाबा.. काही आकर्षण असेल तर सोडून दे... तू तुरुंगात गेलेलं आम्हाला नाही खपणार.. परत अमित म्हणाला.

ए... गप्प बसा... तिला मिळवण्यासाठी मला मदत करत आहात की भीती दाखवत आहात. जी लोकं कुणाला भित नाही ना ती फक्त प्रेमाला भितात.

हो खरं बोललास.. अशी एकतरी गोष्ट असेल तिच्या आयुष्यात ज्यामुळे ती इतकी कठोर झाली आहे. आपल्याला ते रीजन हवंय... सुनैना म्हणाली.

हो प्रेम पुत्रा... आपल्या कृपेने सगळं ठीक होईल.. दिग्या थोडा डिवचत म्हणाला

ए... गप्प बस... एकदम शांत... कॉमेडी करणं बंद कर... आणि कामाला लाग... आणि मी उठून चालला गेलो.

चला... बॉस रागावले आहेत. आता लवकरात लवकर कसंही करून मॅडमला जमा करावेच लागेल. जो म्हणाला

हो पण हा करणार काय आहे? सूनैना म्हणाली..

काय माहित? आशा म्हणाली.

हो... पण तुरुंगात नाही जाणार ना.
जो च्या या वात्रतपणामुळे सगळ्या मित्रांमध्ये हशा पिकला.

यावरून एक गोष्ट मात्र नक्की कळते. की माणसाचं जीव ज्यावर जडते ना त्याच्यासाठी वाट्टेल ते करण्याची जिद्द तो ठेवत असतो. पण एक बघा ना.. मित्रांनी तिच्याबद्दल इतकी माहिती काढून आणली पण अजूनही मी तिच्याशी बोलू शकलो नाही. तुरुंगाच्या भीतीने नाही तर तिच्या मनात माझ्या बद्दलचे वाईट व्यक्तित्व असू नये म्हणून. कारण प्रेमाचं दुसरं नाव आहे प्रामाणिकपणा. आणि तो मला तिला अगदी शेवटपर्यंत द्यायचा होता.

## ३) तिचं बोलणं...

प्रेम म्हटलं की माणूस ते मिळवण्यासाठी अगदी कसोटीला उतरतो. नाही नाही ते प्रयत्न करतो. मीही खूप प्रयत्न केले पण मला तीच्यातले रीजन्स नाही मिळाले. तेव्हा कळलं की आपण रिजन सोडून द्यावं आणि कुण्या नव्या प्रयत्नाला लागावं. जर तिच्याबद्दल काही जाणायचे असेल किंवा काही बोलायचे असेल तर सगळयात आधी तिचं मन जिंकायला हवं. स्वतःला तिच्या मनात इतकं श्रेष्ठ करावं लागेल की ती बदलेल. स्वतःचं मन मोकळे पणाने ती स्वतः माझ्या समोर मांडेल.

तसं ती एकदम साधीच होती. म्हणजे मी कधीच तिला जीन्स टॉपवर कधीच तिला बघितले नव्हते. अगदी ही लाली सुद्धा मला कधी तिच्या ओठावर दिसली नव्हती. अगदी सिंपल राहणं.. आणि अगदी सिंपल खाणं. आजही अगदी तिच्यात काहीच फरक नव्हता. अस्सल मराठमोळी मुलगी वाटत होती.. सनकण कानाखाली आवाज काढणारी.

जेव्हा तिच्यासोबत मैत्री जुळवण्याचे आणखी कोणतेच पर्याय दिसले नाहीत. तेव्हा मी योग्य त्या संधीचीच वाट बघत होतो. आणि असतात काही योगायोग. नेमकी त्या दिवशी ती संधी चालत आली होती.

कॉलेजचा न्यू इयर धमाका. कसले कसले कार्यक्रम आयोजित केले होते. आणि ती फार माईंडणेस असल्यामुळे नेचर ऑफ लाइफ या मुद्द्यावर अस्खलित भाषण ऐकवलं होतं सगळयांना. आणि नेचर चा विषयावर माझी पी एच डी होती. कारण लहानपणापासून मला तशी आवड होती. काही लेखही लिहिली होती. आणि कितीतरी खटाटोप करून काही दुर्मिळ वनस्पती पण मिळवल्या होत्या.

कॉलेज सुटल्यावर सहज अन्नपूर्णकडे निघण्यासाठी वळणार इतक्यात गॅलरीत तिची हाक आली.

शेखर जरा थांबतोस का?

मी वळून बघितलं तीच होती. पण मला वाटलं तिला काही माहीत तर नसेल ना झालं माझ्या एकतर्फी प्रेमाच्या बद्दल. कारण ती अशी कुणाला हाक मारताना आणि तेही नाव घेऊन. थोडं अजीब वाटत होतं. मनात थोडी भितीपण भरायला लागली होती. म्हणून तिच्याकडे न पालटत जागीच थांबलो. ती जवळ आली आणि म्हणाली..

शेखर मला तुझ्याशी एक काम आहे.. करशील ना..

काम... माझ्याशी!.. कोणतं?( जरा अडखळत)

अरे काही नाही.. वनस्पती बद्दल काही मदत हवी. ( वनस्पती चं नाव घेताच जीवात जीव आला. )

कोणत्या वनस्पती बद्दल...

मी काही दुर्मिळ वनस्पतींचे संशोधन करीत आहे. मला तुझ्याकडे काही अश्या वनस्पती आहेत म्हणून मला माहिती मिळाली. मला लाजाळू विषयी माहिती हवी.

लाजाळू... ह.. हो त्याचे रोपटे आहे माझ्याकडे. एक काम कर.. उद्या ते रोपटे घरी घेऊन जा. आणि काय अभ्यास करायचे ते कर आणि मला परत आणून दे. त्याची डिटेल पण मी तुला उद्यालाच देईन. चालेल.

चालेल ना... थ्यांक्स शेखर

ओके बाय.. त्याची काहीही आवश्यकता नाही...

मंद मंद पावले टाकत ती तिथून निघून गेली. आणि मात्र ती माझ्याशी बोलली या सदरात मी तिची पाठमोरी आकृती बघत राहिलो. पण एक गोष्ट होती.. मित्रांनी मला लपून बघितलेले होते. त्यामुळे प्रत्येकजण कैदी तुरुंगात गेला अशी टपरी हूक उडवू लागले होते. आणि मी त्यांना कानाडोळा करत तिथून निघून गेलो.

त्या दिवशी ती पहिल्यांदा घरी आली होती. सभोवार नजर टाकत अंगणातल्या फुलांकडे बघत बसली. अंगणात मला एक नवीन प्रकारचं फुल फुलून बसलय असं वाटत होतं. क्षणभर तिच्याकडेच बघत होतो खिडकीतून.

ओठांवर तिची अबोल मुद्रा होती सैरभैर उडणारे केस सावरत प्रत्येक फुलांना ती अशी न्याहाळून बघत होती. की एखादा फुलपाखरू जसा परागकण या फुलांवरून त्या फुलावर नेतो. आणि फुलेपण तिला साद देत होती. तिच्या स्पर्शाने जणू त्यांना नवीन जीवन मिळते आहे असं वाटतं होतं. तिच्या प्रत्येक स्पर्शाने फुल कसं टक लावून बघत होतं. अंगण जसं उजळून गेल्या सारखं वाटत होतं.

मी अचानक बाहेर निघण्याच्या निमित्ताने निघाली. आणि तिची नजर पडताच मी परत तिच्या मोहात पडलो. शेवटी मोहाला आवरत तिचं म्हणाली..

फार छान सजवलयस अंगण शेखर.. अगदी फुलांची बाग दिसतेय..

ह... आधीपासूनच छंद आहे मला..

हो का... फार छान आहे...

अग इथेच बोलणार आहेस काय? घरात तरी चल..

नको पुन्हा कधी तरी.. आत्ता मला वेळ होत आहे. ते लाजाळूच झाड तेव्हढ दे पटकन. आणि डिटेल्स पण..

हो एक मिनिट.. मी आणून देते

आकर्षण पण काय वेड असतं... नाही का! एखाद्या गोष्टीकडे मन लावून बघणे जोपर्यंत त्या मनाला समाधान नाही होत की ती आपली आहे म्हणून. आणि जे मन बोलेल ते आपण करायचं. आपण त्या मनाचेच गुलाम होऊन जातो. आता तिच्याबद्दल मनात अपार प्रेम असुनही माझी व्यक्त करण्याची हिम्मत झालीच नाही. हळूहळू तिच्यात होणारा बदल मात्र तीव्रतेने जाणवत होता.

अबोल असणारी ती आता बोलू लागली होती. उग्र असणारी आता शांत वाटत होती. गालात हसणारी आता स्मितात पसरू लागली होती. जसजसे ती मला कळायला लागली. तसतशी ती मला परत आवडू लागली होती. तिला परत भेटण्याची आस मनात दाटत होती.

त्यादिवशी क्लास तर कमीच होते. पण सराव असल्या कारणाने बऱ्याच उशिरा कॉलेजला सुट्टी झाली. मी आणि माझे मित्रगण नेहमी सारखे अन्नपूर्णा मध्ये बसून होतो. सायंकाळच्या पावसाने थोडेफार ओले झालो होतो त्यामुळे अंगात थोडीफार थंडी वाटत होती. सगळे फक्त एकमेकांकडे दात वाजवत बसले होते. मग आशाने चहाची ऑर्डर दिली.

सगळे गप्पा मस्करी करत चाय पित होते. आणि मयुरी आमच्या ग्रुपला जॉईन झाल्यापासून ग्रुपला जरा वेगळाच आनंद वाटत होता. आणि सगळे आम्हाला पाहिजे तेव्हढा फ्रीडम देत होते. आणि माझा विरंगुळा परत तिच्या दिशेने खेचत होता. चहाचं कप ओठाला लावणे म्हणजे फक्त निमित्त होता बाकी तिच्याकडे चोरून बघणे हाच माझा उद्देश होता.

पण असं समोरासमोर असुनही कुणाचीच बोलायची ह्मत होत नव्हती. आशा मी बोलायला हवं म्हणून मुद्दाम पायावर पाय आपटत होती. बहुतेक मयुरीच्या ते लक्षात आलं असाव. आणि तिनेच बोलायला शुरुवात केली.

शेखर..

ह... ( चहाचं कप टेबलवर ठेवत. )

तुला जशी वनस्पतींची आवड आहे. तशी इतर कशांची नाही का?

इतर कश्यांची म्हणजे... हो आहे ना... मला ना... भटकंती करायला आवडते. नवनवीन ठिकाणे बघणे. तिथल्या आठवणी जमा करणे.. खरतर निसर्गाच्या बाबतीत मी फार वेडा आहे.

अरे सेम... मलापण निसर्ग फार आवडते... मग जाऊयात लांब कुठे तरी...

मी नेहमीच तयार असतो या बाबतीत.

मी पण..

आम्ही पण... ( सगळयांचं एकच सुर)

ते आठवून चेहऱ्यावर सुंदरशी एक हसरी रेखा उमटली. काय दिवस होते ते कॉलेजचे. अचानक आठवलं विचारांच्या तंद्रीत असताना जेव्हा मला जाग आली तेव्हा मी काहीतरी ऐकलं होतं. आणि काही क्षणात मी मागे वळून बघितलं.

## ४) आशाची भेट

विचारांच्या तंद्रीत असलेला ते कश्याच्या तरी आवाजाने भंग झालो होतो. मागे वळून बघितलं तर माझ्या कारच्या मागे एक कार येऊन थांबली होती. त्या कारचा ड्रायव्हर सारखा इंजिन उघडून बघत होता. बहुधा गाडीत काही खराबी आली होती. म्हणून मी मग गाडीपाशी जाऊ लागलो. तितक्यात मागल्या दरवाज्यातून लॉक उघडण्याचा आवाज आला. कोण आहे म्हणून तिकडे लक्ष गेली. तर ती आशा होती. माझी कॉलेज मैत्रीण. आणि बघता क्षणीच तिनेही मला ओळखलं होतच. आणि तीच म्हणाली..

अय्या शेखर तू...

आशा... काय सरप्राइज दिलं यार तुने... पण इकडे कुठे?

अरे नातेवाईकांकडे गेले होते... आणि तू...

कॉलेजमध्ये असताना एकसोबत असणारे आता इतका मोठा अंतर आला होता. हे आज कळायला आलं होतं. गाडीची दुरुस्ती होईपर्यंत आम्ही जरा रोडच्या काठाला हिरवळीवर जाऊन बसलो. आज जणू कित्येक दिवसांनी मी तिला भेटलो होतो. कित्येक दिवसांनी आज आपल्या माणसांशी बोललो होतो.

फार बदललायस शेखर एवढ्यात.. तुला कळतंय तरी का? कॉलेजच्या नंतर आज आपण पहिल्यांदा भेटत आहोत... आणि तेही इथे... या वळणावर

कळतंय आशा... कारण प्रत्येकाच्या तोंडून ऐकून थकलोय मी.. आणि आता पूर्वीच्या सारखं आता काही राहिलं पण नाही ना...

तू अजून नाही विसरलास शेखर त्या गोष्टी... अरे ती सुखात असेल.. पण तुला आजपर्यंत सावरायला तरी हवं होतं... का अजून तू तिच्यासाठी एवढा त्रास करवून घेत आहेस.

मी खेळ नव्हतं खेळला आशा तिच्याशी... माझं प्रेम होतं तिच्यावर.. पण ती का समजू शकली नाही... तिच्यामुळे मी माझ्या प्रतिकला पण... ( आणि मी हुंदके देऊ लागलो. ) का तिने असं केलंय?

आज कितीतरी दिवसांनी मी माझ्या मैत्रिणी समोर माझं मन कथन केलं होतं. कुणी आपलं म्हणून हृदय मोकळं करून रडलो होतो. आणि प्रत्येक क्षणाला आपलं समजून तीही मला सांत्वन देत होती. काही काळ मला तसच निपचित पडून रहावेसे वाटले आणि डोळे मिटून मी परत जुन्या त्या आठवणीत शिरलो.

---

(परत एकदा आठवणींच्या काळोखात. )

कुठेतरी बाहेर जाण्याचा अट्टाहास हा सगळयांच्या एकमताने झाला होता. आणि सगळयांचा म्होरक्या म्हणजे मी.. मग मी काय ठरवणार... ठिकाण असं बघायचं एकदम

जवळचं.. जेणेकरून आपल्याला लवकरात लवकर परत यायला बरं होईल. मग काय रोजाना स्थळे यायची आणि मी नकार द्यायचो. कारण स्थळे एकतर लांब पडत शिवाय तेच तेच बघणे ही कुणाला आवडत नसत. शेवटी हो नाही म्हणत पेरजागढ फिक्स झालं.. आणि दिवस तेव्हढा ठरवायचं बाकी राहिलं.

आमच्या ग्रुपमध्ये असलेल्या दोघांची नावे माझ्या कानावर येत होती. परंतु त्यांच्या बद्दल काहीही पुरावा नसल्याने मी त्यांना काहीच म्हणू शकत नव्हतो. ट्रीप दरम्यान काहीतरी गोष्ट मला सापडेल हेसुद्धा माहीत होतं. कारण विश्वास कधीही जवळचेच लोक तोडत असतात.

पेरजागढ चंद्रपूर जिल्ह्यातील एक डोंगर रांग. त्याला तिथल्या ग्रामीण भाषेत सात बहिणींचं डोंगर म्हणून संबोधत असतं. चढायला कठीण आणि खडकाळ अशी डोंगर कपाळी. त्यामागच्या बऱ्याच अश्या दंतकथा पण मी ऐकल्या होत्या. त्यामुळे माझी जायची तर इच्छा होतीच. आणि शिवाय आज मित्रांचाही तेव्हढा साथ होताच.

शेवटी दिवस ठरलं. आणि मजल दर मजल करीत शेवटी पेरजागढावर आलो. कठीण खडकांची पायवाट छातीत दम भरत होती. त्यामुळे अमच्यातली काही मंडळी दर ५_१० मिनिटांनी सावली बघून बसून जायची. बाहेरून छोटंसं दिसणारं ते डोंगर आता हळूहळू विशाल होत चाललं होतं. रचून ठेवल्यागत असलेल्या त्या दगडांची रचना खरंच अद्भुत होती. आणि आजूबाजू असलेला परिसर पण छान वाटत होता. वरून सगळं जंगल, जवळपास असलेली गावे इवली इवली वाटत होती. वर असलेल्या मेघांच पण काय दृश्य होतं? जणू काही डोंगर आकाशात गेलंय आणि मेघ त्याला विळखा घालत आहेत असं वाटत होतं. आमची सगळी मंडळी दगडांवर गवतात जिकडे तिकडे सेल्फी काढू लागली होती.

मला सेलफिपेक्षा निसर्गाचे क्रापच्युर केलेले फोटो आवडायचे. त्यामुळे मी एकांतात निसर्ग सौंदर्य न्याहाळत नवनवीन फोटो घेत होतो. काही काही अत्यंत कठीण ठिकाणी प्रेमीयुगुलांचे नाव लिहिले असायचे. स्वतःचं प्रेम अजरामर राहावं म्हणून प्रेमवीर कसे कठीण कठीण जागेवर जाऊन स्वतःचे नाव कोरतात. शेवटी वेडे प्रेमच असते ते ना ते. एका दगडावर बसून छानपैकी त्या दीलाकडे बघत बसलो.

एव्हाना तिकडे सगळ्यांना भूक लागली होतीच. आणि म्हणून सगळे मला शोधत होते. शेवटी मयूरीच माझ्या शोधात आली..

शेखर... शेखर... कुठे आहेस तू?

हो... अग इकडे आहे...

अरे काय करतोयस?( जवळ येत. ) सगळे वाट बघत आहे तुझी.

हो का... बस फक्त एक फोटो घेऊ दे...

बाय द वे... फार छान स्थळ निवडलं आहेस तू... या नवीन स्थळावर येऊन फार छान वाटतंय...

अग स्थळ नवीन नसतं. नवीन आपण त्या स्थळांवर असतो. आपल्याला फक्त ते आत्मसात करणं असतं. बघ ना अगदी प्रेमही इथे वास्तव्य करतं. (त्या दिलाकडे बोट दाखवत. )

हो... पण मला त्यात इंटरेस्ट नाही..

अग प्रेम ही इंटरेस्ट घ्यायची वस्तू नसते. ती आपोआप होत असते...

अश्या शांत एकांती,

दोघांच्या नजरांती...

वाहते ती प्रीती,

सुखावह सूखांती...

वाह, मस्त लाईन आहे... चालू ठेव तुझं...

प्रेम हे एक आभास असते. हृदयाच्या आचलावर या दीलाप्रमाने कोरलेले. त्यालाही निस्तेज भावना आहेत. फक्त त्याला मनामध्ये साठवाव लागतं. फिलिंग आणाव्या लागतात. बघ मग ते कुणासाठी धडधडते ते..

म्हणून कविवर्य नेहमी म्हणत असतात...

जन्माला आलेल्या प्रत्येकाने,

एकदा तरी प्रेम करून बघावे...

भलेही ते सफल न होवो,

पण अनुभवाच्या शाळेतूनी जावे...

काय बोलतोस यार... प्रेम ही भावना फार जवळून बघितलं आहे असं वाटतंय... खरं तर मला कधी प्रेमाच्या बाबतीत काहीच माहिती नाही. आणि ज्यांनी मला विचारलं त्यात स्वार्थ आणि वासना दडलेलीच होती. आणि जी पुस्तकं वाचली त्या पुरतीच मला ती गोष्ट वाटली त्यामुळे आजपर्यंत मी स्वतःला अव्हेरले होते स्वतःला. पण हा थ्यांकसं फॉर यू...

कश्याबद्दल?

तुझ्यामुळे मी स्वजगाच्या बाहेर आले. आता घरी नेहमी म्हणतात की तू फार बदलली आहेस म्हणून. पूर्वी म्हणजे एकदम अबोल, रागीट स्वतःच्याच जगात गुंतलेली. पण त्या पलीकडेही जग आहे हे तू दाखवलं मला. तुझ्या सहवासात मी केव्हा स्वतःच्या जगातून निघाले काही कळलंच नाही. आणि याचं सगळं श्रेय तुलाच जातं...

आपण फ्रेंडस आहोत ना.. आणि आता तू आमच्यातली एक आहेस. मग नो थ्यांक्स

आणि नो सॉरी... पण एक सांग? तुझ्यात असा अबोलपना इतक्या प्रमाणात कसा का आला?

त्याला वळण म्हणतात शेखर. लहानपणापासून जशी जगण्याची त्याला सवय होते ना तसाच तो वागत राहतो. माझ्या वडिलांचं आणि आईचं प्रेम विवाह च होतं. पण कालांतराने त्यांचं प्रेम त्यांना सांभाळता नाही आलं. लग्नानंतर प्रत्येक गोष्टीत त्यांना तडजोड करावी लागायची. कालांतराने मी झाली. पण त्यांच्या प्रत्येक वादात मी एकटी पडायचे. काहीवेळा त्या तडजोड मध्ये माझीही गणना व्हायची. त्यामुळे प्रेम या विषयाबद्दल माझ्या मनात तिरस्कार निर्माण झाला होता. आता ते वेगळे राहतात. आणि मी दोघांशी पण बोलते पण कधी मला त्यांच्यात इतके स्वारस्य आले नाही. आणि तोच प्रभाव माझ्यावर पडत आला.

चल आता निघुयात... बाकी जन वाट बघत असतील. गप्पा मारायला इतके दिवस पडलेत. लवकर घरी पण निघायचे आहे.

अग... हो येतोय... गप्पा मारायला वेळ असेल ग... पण सोबतीला हा निसर्ग नसेल ना...

## ५) परत एकदा मित्रांची भेट...

तसं सगळ्यांना माझ्याबाबत माहिती असल्यामुळे आम्हाला डिस्टर्ब करणारं असं कुणीच नव्हतं. पण आज तिच्या चेहऱ्यावरचे आपले पणाचे भाव पाहून आपण कुठेतरी यशस्वी झाल्याची कल्पना मला जाणवत होती.

आणि शिवाय त्या त्या दोघांची पण माहिती निघाली होती. जी लपून छपून हे सगळं करत होते. आणि आता समोरच्या बैठकीत सगळ्यांना घेऊन निर्णय घ्यायचं होतं.

_________________(अचानक फोनचा आवाज ऐकुन वास्तविकता प्रगट होणे. )

तेव्हढ्यात आशाला कुणाचातरी फोन आला. व्हिडिओ कॉल रिसेविंग करत ती हाय करत होती. तो अमित होता. आज इतक्या दिवसांनी मी त्याच्याशी बोलत होतो. तेव्हा कळलं होतं की इतक्या दिवसांत मी एकच गोष्ट हरवली होती ती म्हणजे मी माझ्या मित्रांना विसरून गेलो होतो. जणू तिला चंद्रावर पोहोचताना मीच शून्यात अवतरून गेलो होतो. आणि खरंच आहे की एखादी गोष्ट जेव्हा मनाला लागून जाते तेव्हा त्या होणाऱ्या यातणाच आपलं विश्व बनून जातात.

जून्यातल्या आठवणीत १० वर्षाचं अंतर घेऊन पुन्हा एकदा गावी उतरलो. ती माझी पहिली भेट. आणि आज सोबत आशापण होती. येताना रस्त्यात जो, सूनैना, दिग्या आणि आशाचा नवरा म्हणजे माझा अगदी जवळचा मित्र अमित पण आला होता. कॉलेज पण फार बदलून गेलं होतं. पूर्वीच्या सारखी काही ती गम्मत राहिली नव्हती. परत एकदा अन्नपूर्णा चे दर ओलांडले आणि शांततेचा भंग करीत चहाची ऑर्डुर दिली. आणि परत चालू झाल्या त्या गमती जमती.

१० वर्षात जग कसं बदललं हे मी आपल्या डोळयाने प्रत्यक्ष बघत होतो. माझं कॉलेज सोडल्यावर अमित आणि आशाने लग्न केलं होतं. अन्नपूर्णा पूर्वीपेक्षा विशाल झाला होता. आणि आता कॉलेजला तेव्हढी गर्दीही दिसत नव्हती. जणू काहीतरी हरवल्यागत होतं पण डोळयाला काही ते दिसत नव्हतं. एक मात्र होतं... मित्रांनी आपापली कामे व्यवस्थित पार पाडली होती.

सूनैना महिला बचत गटांची सी आर झाली होती. जो एका ट्रान्सपोर्ट कंपनीचा मॅनेजर होता. आणि दिग्याने कॉम्पुटर mscit करून अजून पुढे काहीतरी करणार असे तो म्हणत होता. आशा आणि अमितने लग्न करून स्वतःचा संसार थाटला होता. सगळयांचे कॉन्टॅक्ट पूर्वीसारखे च होते. शिवाय मला सोडून.

आज सगळेच होते. आपापल्या खुर्चीवर बसून. आणि माझी लक्ष गेली समोर असणाऱ्या त्या रिकाम्या खूर्चीकडे. जिथे तासनतास आमची चर्चा चालायची. आणि परत एकदा हृदयात धास्स झालं.

आजची पार्टी ही दिग्या कडून होती. कारण दिग्याचा लग्न जुळला होता. आणि त्यामुळे सगळया लागेल त्या सामानाच्या यादिसह सगळयांच्या मते फ्रेंडशिप डे साजरा होत होता. नको तेव्हढी दारू, नको तेव्हढे सिगरेट सगळं कसं अपरिचित वाटायला लागलं होतं मला. जणू कित्येक दिवसांत मी जगणेच सोडून दिलं होतं.

अचानक एक आठवलं असे म्हणत दिग्याने आपला कॅमेरा आणला आणि त्याला कॉम्पुटर सोबत जोडला. आपल्या सहवासाच्या सोबतीचे एकेक क्षण त्याने तिथे टिपलेले होते. ते तो कॉम्प्युटरचे प्रिंटवर दाखवू लागला.

तो बघ जो...

ही बघ सूनैना...

सगळयांचे हसत हसत असे उद्गार येऊ लागले. आणि अचानक मग सगळयांच्या चेहऱ्यावर शांतीचे चिन्ह दिसू लागले. प्रींटवर माझा आणि मयुरीचा फोटो होता. माझ्या खांद्यावर डोकं ठेवून स्वतः तिने तो शूट घेतला होता. ते फोटो बघताच मला असह्य वेदना झाल्या. आणि पुढचे फोटो न बघताच मी बाहेर चालला गेलो.

आत्तापर्यंत चालू असलेला गोंधळ शांत झाला होता. कारण प्रत्येकाच्या मनात ती शंका दाटत होती. आता कुठे असेल ती?

कारण सगळयांनी आत्तापर्यंत तिचा फार शोध घेतला होता. पण ती मिळाली नव्हती. कारण त्या दिवशी तिला जाताना सगळयांनी शेवटचे च बघितले होते.

सगळे मिळून माझ्यापाशी आले. झालेल्या प्रतिक्रियेवर माझी माफी मागू लागले. पण मला त्यात काहीच इंटरेस्ट नव्हता. सगळयांना शांत करीत मी परत त्या घोळक्यात सामील झालो. सगळे नको ते उपदेश, नको ते सल्ले देत होते. आणि मी फक्त मानेनेच होकार देत होतो.

सकाळी मी सगळयांचा निरोप घेतला. आणि इकडे नागपूरला निघालो. तसं प्रत्येकजण म्हणत होता... आतातरी शेखर येत जा रे... असं सोडून नको देऊस. पण ज्यांनी मलाच सोडून दिलं होतं. त्यांना तरी हे बोलायला शोभत होतं का?

मला पत्रिका कोण पाठवली? ह्या गोष्टीचं उत्तर मला अजुनही मिळाला नव्हतं. आणि त्याच विचारात असताना फोनवर रिंग आली तीही एका ओळखीच्याच माणसाची. फोन उचलावे

की नको हेच मला कळत नव्हते?कारण त्या दिवसापासून मी कधी त्यांच्याशी बोललोच नव्हतो. शेवटी आढेवेढे घेत मी फोन उचलला त्यावेळेस वडील जे बोलले ते फार विचित्रच वाटले.

असं लग्नातून कुणी पळून जातो का रे? तेही स्वतःच्या मावसबहिणीच्या लग्नातून?काय लग्न झाले म्हणून भावाची सगळी कर्तव्ये पार पडतात का?का असं अर्ध्यातून पळून गेलास? जेव्हा लोक मला विचारत होते तेव्हा उत्तर द्यायला माझ्याकडे काहीच नव्हतं. अशी अवस्था करून टाकलीस आमची.

हे असं होतं की सत्य असूनसुद्धा मी काही बोलू शकत नव्हतो. आणि त्याचे कारणही इतकेच होते की मी अंतराच्या पलीकडे जाऊन पोहचलो होतो. आणि हे सगळं मी त्यांना तर कधीच सांगू शकलो नसतो. काही मिळकत करून मोठ्या बहिणीला फोन केला आणि लग्नातली काही इमेज मागितले. आणि एक एक करत बघू लागलो.

लग्न म्हटले की सगळयांच्या मनात जितकी खुशी असते तितकीच धड त्यांच्या मनात चालू असते. आणि या सगळयात काही वेळा कुणाच्या मनाचा सुद्धा विचार करण्यात येत नाही. आता माझंच बघा ना! इतकं सगळं होऊन गेलंय तरी कुणाला काही कळलय का? प्रत्येक फोटोत नवरदेवाच्या चेहऱ्यावर मला जितका आनंद वाटत होता. तेव्हढीच माझ्या बहिणीच्या चेहऱ्यावर शंका. आणि जेव्हा मुलगी लग्नात सजते ना.. खरंच तिच्याकडे बघतच रहावं असं वाटते.

सलवार स्कर्टच्या पोशाखात असणारी मुलगी तीच एकदम पाताळात तरुणी झाल्यासारखी जाणवते. काय प्रवास असतो स्त्रीचं? एका घरी जन्म घ्यायचा आणि वंशाचा दिवा मात्र दुसऱ्यांना द्यायचा?वडिलांचं नाव घेऊन स्वतःला घडवायचं आणि त्याच नावाचा गुणाकार करून अख्खं आयुष्य दुसऱ्याला द्यायचं. कधीकधी फार अभिमान वाटतो ह्या स्त्रियांचा.

अचानक तिचे फोटो नेक्स्ट करता करता तिच्यासोबत हसरी मयुरी केव्हा आली काही कळलंच नाही. खरतर हसताना ती अगदी तशीच दिसत होती जशी मी तिला पहिल्यांदा बघितली होती. आजही तिच्यात काहीच फरक दिसत नव्हता. अबोल, हसरी दुराव्याने तिच्यातला स्वत्व जागृत केला होता. आणि तिच्याही बाबतीत ते बरोबरच होतं. तिच्या स्वत्वाच्या बाहेर होतंच कोण तिला सांभाळायला. पण आता हे सगळं मर्यादित नव्हतं आणि माझ्या कल्पनेतही नव्हतं.

## ६) प्रेमाचं उगम होणं...

पेरजागडावरून झालेल्या भेटीनंतर आमच्यात असलेला अबोला आणि परस्परांची असलेली भावना सगळी विरक्त झाली होती. त्या दिवसांपासून भेटी वाढल्या होत्या. आणि विषयपन आता वाढू लागले होते. आणि आता मनातली स्पंदने पण आता ठोके वाजवायला लागली होती. मला मात्र आवडायचं हे सगळं. कारण जे पाहिजे होतं ते अगदी सहज मागितल्या प्रमाणे मिळायला झालं होतं. पण होतं असं... सुखात वाहत असताना समोर असलेल्या दुःखाची जाणीव नसतेच कुणाला. आणि माझ्याही बाबतीत तेच होतं. कुणाला माहीत होतं समोर काय वाढून ठेवलं होतं ते ?

कधी निसर्गयान तर कधी घोडाझरी तलाव तर कधी शिव टेकडी. रोज नवनवीन रस्ते बदलत होते. पण एक होतं... इतकं वाहवत असतानाही कुणाच्याही मनात हा प्रश्न येत नव्हता की प्रेम व्यक्त कुणी करायचं?

आणि प्रेम आहे की नाही हेही ठरवणं जरा महत्त्वाचं होतंच. आणि शिवाय काठीनही. कारण जोपर्यंत शब्द ओठांवर येत नाही तोपर्यंत त्यांचं काहीच अर्थ निघत नाही. आणि प्रेम ही डोळयांची भाषा असली तरी डोळयांनी तू उमगवणे

हे जरा खूप साहसाचे काम असते. आणि म्हणून तर ठरलं आहे की प्रेमात आणि युद्धात सगळं काही माफ असते.

पण जेव्हा मनातलं काही बोलायचं असतं ना त्याच्यासाठी डेरिंग लागते अशी व्याख्या नेहमी अमित मला द्यायचा. मी कित्येकदा प्रयत्न केला पण नाहीच जमलं. कॉलेजच्या

फेस्टिव्हलमध्ये मी एक गाणं सादर केलं होतं. अर्थात ते तिच्या साठीच होतं. आणि तिच्यावरच ते लिहिलं होतं.

गाणं म्हणत असताना सतत ती कुठेतरी असल्याचा भास होत होता. प्रत्येक वाक्यातल्या प्रत्येक शब्दात ती फक्त माझी असावी असच वाटत होतं. पण तिच्या मनात माझ्याविषयी काय फिलिंग येते ते मला बघायचं होतं..

प्रथम दर्शनी स्टेजवर चढल्यावर क्षणभर डोळे मिटले आणि तिचा चेहरा डोळयांत साठवून घेतला. आणि मग एक उसळता उत्साह घेऊन उच्चारले...

माझ्या मित्र आणि मैत्रिणींनो हे काही खास शब्द कुणाच्यातरी आठवणीत तुमच्या समोर गातो आहे..

स्वप्नातली परी लाजली
अबोली खळी मना भासली
हसता क्षणी जशी सानुली
जशी हृदयी सुर सजली..
साजणी.. साजणी.. तू माझी साजणी...
साजणी.. साजणी.. मी तुझा ग साजणी.. //धृ. //

तुला शोधे नयनात, निळया निळया गगनात,
ओढ लागली तुझ्या सूवासा...
तूच माझं जीवन तू, तूच माझी कविता तू,
जगण्याची तू आहे एक आशा...

ओढ लागे तुझ्या रुपाची, जशी रात्र आहे मिलनाची...
जशी रात्र आहे मिलनाची...
साजणी... साजणी...... //१//

तुझ्याविना हे क्षण सुने, तुझ्याविना कसे हे जगणे,
तुजविण मी आहे अधूरा सा...
प्रीत माझी तुझ्या प्रभावर, अप्सरा तू सूरांगणावर,
तूच माझा सूरज माझी निशा...
डोळयांनाही प्रतिमा तुझी, हृदयात जशी मुरत तुझी...
हृदयात जशी मुरत आहे तुझी...
साजणी... साजणी...... //२//

टाळयांच्या कलकलाटात अस्खलित झालेलं स्वागत बघून आपण एक उत्तम लेखकही होऊ शकतो याची सुद्धा प्रचिती आली. आणि खरं सांगायचं म्हणजे ज्या व्यक्तीसाठी मी इतकं सगळं करीत होतो तिचं व्यक्ती जेव्हा प्रतिसाद करताना मला दिसली नाही याचंच तेव्हा थोडं वाईट वाटलं. पण खरा आनंद त्या दिवशी वाटलं ज्या दिवशी पार्टी झाली.

आमच्यात एक ठरलं होतं. थोडक्यात तरी प्रत्येकावर पार्टीची वेळ यायची. आणि आज ती सूनैना कडून होती. त्यामुळे आम्ही सगळे तिच्या घरी जमलो होतो. बियरच्या नशेतच काही इतक्या रमल्या की जणू दरूचीच नशा चढली आहे. आणि तेव्हाच मी मयुरीला स्टेजवर म्हटलेलं गाणं गुणगुणत असताना बघितलं. तेव्हा कळलं की न दिसता तिने गाणं ऐकून ठेवलं होतं. तेव्हा कळलं की मुलगा जसा दाखवून स्वतःच्या भावना प्रगट करत असतो. उलट मुली त्या भावना पदराखाली टाकून ठेवतात. आणि या सगळया मोहजालातच कित्येकांची दैना उडून जाते.

त्या दिवशी असाच मुसळधार पाऊस होता. कुणाला तर जागचे हलायला सुद्धा मिळाले नव्हती. कॉलेजच्या आजूबाजूला गर्द झुडुपे होती. आणि त्यापेक्षाही सुंदर म्हणजे. मऊ मऊ गाद्यांची गवताचं गालीच पसरलं होतं बागेत. त्यांना मुबलक आहार मिळाल्यामुळे कित्येक फुलझाडांची फुलेपन निघाली होती. आणि त्यामुळे बाग कशी उजळून निघाली होती.

२ ते ३ माणसे बसतील असं एक बाई होतं तिथं बागेच्या मध्यंतर. जिथे बसून अख्ख्या बागेची पाहणी होत असे. आणि पाऊस किंवा उन लागू नये म्हणून बाकावर छत्रपण बसवलं होतं. मला हिरवळीचा छंद असल्यामुळे कित्येक खाली वेळेत मी तिथे स्वतःची करमणूक करायचो. त्यादिवशी असच मी तिथे बसून होतो. मी कुठे दिसलो नाही हे बघून मयुरी पण माझ्या पाठमोरी आली होती. आणि काही क्षण गेलेच असतील तर पावसाने शुरुवात केली होती.

सगळीकडे वातावरणात थंडीची लहर चालून आली होती. आणि पाऊस जरा बराच असल्यामुळे मी आणि मयुरी पण तिथेच कुडकुडत बसलो. हातपाय थरथर कापत होते. दातसुद्धा वाजायला लागले होते. तरी पण तोंड उघडलाच शेवटी तिने..

काय थंडी वाजते रे... ?

हो ना...

चल कॉलेजमध्ये आत जाऊया...

अगं पाऊस रिमझिम नाही मुसळधार येत आहे. आत्ताशी इतकी थरथर करत आहेस. मग ओलाचिंब झाल्यावर किती...

हो पण हा पाऊस किती वेळ राहणार... चल मग आपण काहीतरी मनोरंजन करूयात... नाहीतरी नुसतं असं वेड्यासारखं बसून असतोसच...

ए... वेडा नाही आहे मी... प्रत्येक गोष्टीत कारण शोधत असतो मी. आता या पावसाला बघ ना.. कसा दुश्मन सारखा पडत आहे... पण तरीही आवश्यकच असतो ह्या हिरवळीला... आता बघ किती नव्याने हिरवळ फुलणार... अजून वनस्पतींचा अभ्यास करतोस.

काय शेखर... कधीही या निसर्गात गुंतून असतोस.. तूच म्हणतोस ना... निसर्गात प्रेम शोधावं लागते... त्याबद्दल सांग ना..

नैसर्गिक प्रेम... यावर काय सांगू आता तुला?

काहीही... मला पटेल असं!

कुठेतरी वाचलं आहे जर खरं प्रेम करणारं असेल तर निसर्ग त्यांना हमखास मदत करतो. प्रियकराच्या किंवा प्रेयसीच्या विरहात हा पाऊसच त्यांना सांत्वन देतो. काहीवेळा तर अश्रू लपवण्यासाठी पण मदत करतो. कित्येकांच्या आठवणी पण या पावसातच जिवंत होतात. शेतकऱ्यांच्या डोळयांच पाणी जेव्हा संपते तेव्हा पवसाचाच त्यालाही आधार वाटतो. चातकाची पण तहान त्या पहिल्या पावसाची असते. कमी पडला तर दुष्काळ आणि जास्त पडला तर महापूर.

पावसाबद्दल जितकं सांगावं तितकं कमीच आहे. म्हणून कवी लोक नेहमी पावसाला म्हणतात..

वेडा पाऊस हा,
न सांगताच येतो...

आठवण तिची आणून,

डोळयांतूनही गाळतो...

जसं चंद्र, ताजमहाल हे प्रेमाचं प्रतीक आहेत, तसेच माझ्यामते तरी निसर्ग हा प्रेमाचा फार मोठा प्रतीक आहे...

ए तू गाणे फार छान गातोस... आणि कविताही छान करतोस... माझ्यावर कर ना एखादी...

तुझ्यावर... आणि कविता...

का? गाणं बरं केलं होतं तयार! ते कुणावर बघून केलं होतं...

एव्हाना पाऊस आता थांबलेला होता. आणि तेव्हढाच तिथून निघून जाण्यासाठी मला हा निमित्त उत्तम होता. खरतर तिने मला त्या एकाएकी वीच्यारल्यामुळे मी थोडा गोंधळलो होतो. तरी मी तो उत्तर देऊ शकत होतो.

पण जेव्हा मी तिच्या चेहऱ्याकडे बघून नजरा नजर करत होतो. तेव्हा मला काय बोलायचं हे काही सुचतच नव्हते. पण कधीतरी तो प्रश्न आणि त्यांचं उत्तर मला द्यावेच लागणार होतं. म्हणून शेवटी मीच म्हणालो..

पाऊस निघालाय चल आता.. उद्या बघू..

असे म्हणत मी वाट धरली. पण मुलींची नजर ही फार प्राणघातक असते. हे पुराणामध्ये सुद्धा आपण वाचलच आहे. माझं विषय टाळणं हे तिला केव्हाच कळलं होतं आणि तीही वेळच बघत होती.

आता काही दिवसांत कॉलेजला सुट्ट्या लागणार होत्या आणि मला काय विचारायचं आहे ते सोडून मीच तिच्यापासून पळून जात होतो. शिवाय तिचा शेवटचा वर्ष होता. आणि आता ती कुठे जाणार हेही माहीत नव्हतं. पण मला जरी तिला भेटायचं असलं तर कुणीतरी जवळपास आहे किंवा मित्रगन असतील फक्त तेव्हाच मी तिच्याशी बोलत होती. आणि मला वाटते तीही तेव्हढ जाणुनच असेल.

आज कॉलेजचा शेवटचा दिवस त्यामुळे सगळेजण अन्नपूर्णा मध्येच बसून होतो. नेहमी प्रमाणे मयुरी माझ्या समोरच बसून होती. मात्र आज चहाची ऑर्डर मात्र तिने हक्काने मारली होती. शेवटी सगळयांची निरोप द्यायची वेळ आली तेव्हा प्रत्येकजण बोलू लागला.

आता कुणी काय ठरवलंय?  मीच म्हटलं.

आपलं आता शेवटचा वर्ष आहे ना. आपल्याला सोडून तर फक्त मयुरी चालली आहे. बघा बाबा ती काय म्हणते?अमित म्हणाला.

काय मयुरी... काय ठरवलं आहेस मग नंतर... आशा म्हणाली.

तसं अद्याप ठरवलं खूप होतं पण प्रतिसाद येत नाही आहे. (माझ्याकडे बघत. आणि मी मान खाली घातली. बाकी जणांना काय समजायचे ते समजून गेले. )

कश्याबद्दल?? जो म्हणाला

काही नाही मला मार्केटिंग करायला आवडते. त्यामुळे जवळपास कुठेतरी जागा बघेन.. पण थांकस हा.. तुम्हा सगळयांचे प्रेम मी हृदयात जपून ठेवीन. आणि माझ्या उत्तराची मी वाट बघत बसेन इतकंच.. चला निघते मी..

ती असं का बोलली. सगळे माझ्याकडे असे बघू लागले जसं काही माझ्याकडे बघून आश्चर्याची बोंब उठत आहे. पण कुणालाच मी त्याबाबतीत काहीच सांगितलं नाही.

त्यानंतर मला मयुरी  भेटलीच नाही. अगदी माझं कॉलेज सुटायला झालं तरी. केव्हा येणार, कधी भेटणार याची तिने कसलीच बातमी दिली नव्हती. मनात फक्त एक प्रश्नचिन्ह कोरून ठेवला होता तो तेव्हढाच..

मयुरी गेल्यानंतर आम्ही कित्येकदा पार्टी वगैरे केली पण नंतर मला तिच्याबद्दल कळत आलं की भावना तिच्या पाशीही होत्या. आणि त्या व्यक्त करायला माझ्याकडे वेळ पण होती. पण पाहिजे तसं मी तिला कधी भेटलोच नव्हतो त्यामुळे तिने मला असं कोड्यात पाडून ठेवलं होतं.

जेणे करून जेव्हा ती येईल तेव्हा मला तिला विचारायला हिम्मत होईल म्हणून.. कितीतरी दिवसांनी मला तिचा लेटर मिळाला. कारण जाताना ज्या पुस्तकात ती ठेवून गेली होती तो पुस्तक तिने नेलाच नव्हता. आज अचानक पुस्तके चाळताना तो लेटर मिळाला आणि मी वाचू लागलो...

*शेखर*

*प्रिय म्हणणार नाही कारण तू मला अर्धवट ठेवलं असल्यामुळे. माझ्यातला बदल घालवताना माझं मनही केव्हा बदलून टाकलास मला कळलंच नाही. सतत तुझं ऐकत राहावे असं वाटत होतं. आणि तुझ्या डोळ्यांत बघताना तेव्हढाच आनंद.*

*सॉरी मला त्या दिवशी तो प्रश्न नको होता विचारायला? पण तुझ्यातला भित्रा शेखर घालवण्यासाठी मला ते करावं लागलं. खरतर स्पष्टपणे मी तुला विचारणार होते. पण तू नेहमी माघार घेत असल्यामुळे तेही अर्धवटच राहिले.*

*तुला हा लेटर बघून वाटेल मी त्यात माझं होकार दिला असेल पण तसं काहीही होणार नाही. मला तुला परस्पर भेटून ते बोलायचय. पण निदान यावेळी तरी नाही टाळशिल ना...*

*तुझं कॉलेज जेव्हा चालू होईल तोपर्यंत मी आलेली असेन... तुझ्या प्रेमाच्या शोधात.. उत्तराच्या आशेत...*

*तुझीच मयुरी*

त्या वेळेस मनावर आनंदही तितकाच होता आणि आता कॉलेज शूरू होई पर्यंतचा विरह. आठवण काढणं कशाला म्हणतात हे आज उमगायला लागलं होतं. स्वप्नात कित्येकदा तिचा चेहरा सामोरी बघून झोपलोही नसेन कदाचित..

## ७) आजोळी...

आजकाल कसं चालतंय? बायको घरात आली की माणूस फक्त सासुरवाडीला जातो. त्यामुळे जवळ असणारी बहीण सुद्धा परकी वाटते. जन्मतःच आईकडल्या मामाची सवय होऊन जाते आणि इतर नात्यांत दुरावा पडतो. पण हा फक्त माझ्या मते असलेला एक निरुपयोगी प्रश्न आहे ज्याचं आज मोठ्या प्रमाणात कार्य चालू आहे.

तसं माझी कुठे जायची इच्छा तर नव्हतीच. पण आईच्या हट्टामुळे मला आजोळी जावं लागत होतं. एक तर तिच्या आठवणीसह मी तिथे राहुपण शकत नव्हतो ज्यामुळे मला कुठेतरी जाणेच होते.

आजोबांच्या गावाकडे नेहमी एकांत वाटत असे. दिवसभर नवनवीन मित्रांसोबत हुंदडणे.. काय मजा चालायची. पण न करमण्याबाबत एकच गोष्ट होती तिथे. ज्यामुळे मी आजपर्यंत तिथे जाण्यास नकार देत होतो. आणि ती म्हणजे मामाची मोठी मुलगी निशा.. तिचं आणि माझं जन्माची वैर असल्यासारखं नातं होतं. कधीच माझ्याशी तिला किंवा मी तिच्याशी चांगल्या पद्धतीने बोललेला एकही प्रसंग आठवत नाही.

नीशाच्या बाबतीत सांगायचं असलं तर थोडी कृश होती आणि एकदम उंचपुरी होती. सावळ्या रंगात थोडीफार शोभेशी अशी होती. तरी तिला तिच्या सुंदर पणाचा फार गर्व होता. काय तो पावडर, ती बेधडक लाली. पण राग सदोदित चेहऱ्यावर असल्यामुळे चेहरा काही शोभायचा नाही. एखादी गोष्ट जर का तिच्या मनाविरुद्ध झाली तर झालं जगातलं तिसरं महायुद्ध चालू.. पण म्हणतात ना समोर जाऊन ह्याच मुली फार विचारवंत होतात.

लहान असताना आई मला नेहमी डिवचत असायची. की शेखर तुला केशु मामाचीच मुलगी मागून द्यायची आहे. आणि तिचं नाव आलं की मी तिच्या नावाने फार वाईट पणे बोलून द्यायचो. आणि आई मात्र मुद्दाम मला डिवचत असायची. तिला फार मजा यायची. एव्हाना निशा म्हणजे मला छळायला आईला एक निमित्त होतं.

विदर्भात उन्हाळ्यात फारसे काम नसले तरी शेतात फार काम असत. आजोबांची १० ते १२ आंब्याच्या झाडांची आमराई होती. पण त्या वर्षीच्या वावटळीने दोन आंब्याची झाडे मुळासकट खाली पडली होती. त्यामुळे मामा आणि मामी दोघेही सकाळीच जायची. आणि मागाहून आजोबा बैलांचं चारापाणी करून बैलबंडी मग नेत असत. रोज लाकडे तोडणे आणि शहरात जाऊन विकणे सध्यातरी हाच त्यांचा व्यवसाय होता.

तिथे गेल्यावर मला पहिल्यांदा तर करमतच नव्हते. वेळ मिळाली की मी आमराईकडे चाललं जायचो पण ती ताकदीची कामे माझ्याने होईना. थकून जायचो. त्यामुळे सहसा मला कुणी कामासाठी येऊ देत नव्हते. आणि घरी टीव्ही बघत बसावं म्हटलं.. तर मग काय तेच भांडण? तुझं तू आणि माझं मी...

सकाळच्याला मामा आणि मामी गेले. की काही वेळाने आजोबा बैलबांडी घेऊन जायचे. जवळपास ९ ते १० वाजेपर्यंत मी डब्बा नेऊन द्यायचो. तेव्हढा एक त्रास निशाचा कमी झाला होता. पण ती काही बोलणार नव्हती. कारण मी तिला कधीच आवडत नव्हतो. आणि नेहमीच ती माझं राग करत असायची. पण सगळं मामाकडे बघून सहन करावं लागायच.

दिवसभर जर निशा आत टीव्ही बघत असली की मी माझं प्रवास निषेध करून टाकायचो. एखाद्या टपरीवर जाऊन बसायचो किंवा मित्रांकडे असायचो. किंवा मोबाईलवर गेम खेळत बाहेरच बसून असायचो.

पण म्हणतात ना, योग येतातच कधीतरी जुडून. निसर्ग हा प्रत्येकाला सुधारण्याची एक संधी देतो. रोजच्या सारखं मी सगळ्यांचा शिदोरीचा डबा देऊन वापस आलो आणि तिला आत टीव्ही बघताना पाहून बाहेरच मोबाईलवर गेम खेळत बसलो.

अचानक घरातून आवाज बारीक पद्धतीने येऊ लागला.

शेखर... शेखर... वाचव... शेखर..

मला वाटलं ती काही गम्मत करत असणार म्हणून फारसा लक्ष न देता परत गेममध्ये मग्न झालो. पण यावेळेस परत तीच आर्त स्वर माझ्या कानी पडताच मलाही थोडं विचित्रच वाटलं. आणि म्हणून मी आत जाऊन बघितलं. बघितलं तर काय ते बघून मलाच थोडी भीती वाटायला लागली होती.

एक नाग साप तिच्या पुढ्यात वेटोळी मांडून फणा काढून उभा होता. आणि तेही जेमतेम अर्ध्या एक फुटाच्या अंतरावरच. निशा घामाने ओलेचिंब झाली होती. त्याचा फुत्कार बघून तिची केव्हाच बोबळी वळून गेली होती. आणि तिची नजर पण हटायला तयार नव्हती.

मी तिच्या पाठमोरीच उभा होतो. पण काय करावं.. काहीच सुचत नव्हतं. आणि कुणाला बोलवावं तर वेळ नव्हती. क्षणाचाही विलंब न लावता निशाच्या दोन्ही दंडांना पकडलं आणि मागे खेचलं. पण तरीपण निशा उठायच्या तयारीत नव्हती. निशा बाजूला झाली आणि परत तो साप फुत्कार करत माझ्यापाशी आला. हातात निशाची ओढणी होती. ती त्याच्यावर टाकून दिली आणि बाजुचीच काठी घेऊन त्याला घराच्या बाहेर काढलं.

निशा इतकी घाबरली होती की येऊन तिने घट्ट मिठीच मारली. क्षणभराचं तिला सांत्वन देत असताना मला मयुरीची आठवण झाली आणि क्षणांत तिला मिठीतुन विलग केले. आता तू

सुखरूप आहेस याची जाणीव करून देत तिला पलंगावर बसवलं. आणि प्यायला पाणी आणून थोडावेळ झोपायला सांगितलं.

असं असतं रूपाला पसंद करणाऱ्या मुली कधी शरीराकडे बघत नसतात. तिला आराम करायला सांगून मी परत टीव्ही बघायला लागलो आणि तिचं कन्हणनं चालू झालं. दोन तासात त्या पोरीने ताप बाहेर काढला होता. मला फार भीती वाटायला लागली होती. आणि माझ्याशिवाय घरी पण कुणीच नव्हते. कसं करू? काय करू? काहीच कळत नव्हते?

खिशात चपापून बघितले असता शे पाचशे रुपये आढळले. घरा शेजारी मित्राला होंडा मागितली. आणि तिला धरून तडक दवाखाना गाठला. दोन इंजेक्शन, एक सलाइन आणि काही गोळ्या पण दिल्या.. पण तिच्या मनातून ती काही भीती जाईना.

काही वेळाने तिला घरी आणलं.. जेवायचं ताट बनवून तिला चारून दिलं आणि काही गोळ्या देऊन तिला आराम करायला सांगितलं. आणि ती झोपली याची खात्री करत शेवटी सुस्कारा दिला. कारण खरं सांगायचं म्हणजे तिच्यापेक्षा मलाच भीती वाटायला लागली होती.

सायंकाळी जेव्हा सगळे घरी आले तेव्हा निशाला असं झोपलेलं बघून त्याबद्दल त्यांनी विचारलं. सगळी कहाणी जेव्हा सर्वांना मी सांगितली तेव्हा सगळे म्हणू लागले. खरंय पोरा.. आज कुणी घरी नसते तर पोरीचा जीव चालला गेला असता. बरं झालं शेखर तू होतास ते. अगदी देवाप्रमाणे तू तिच्या पाठीशी राहिलास.

## ८) परतीचा प्रवास...

त्यांनतर रात्री जेव्हा निशाला जाग आली. तिला थोडं बरं वाटायला लागलं होतं. आणि एव्हाना आता तापही बराच उतरला होता. सगळ्यांकडे बघून तिने आपण बरं असल्याचा दृष्टांत दिला. थंडी वाऱ्याची लहर बेभान पसरत चालली होती. आणि त्याच हवेत मी कानात हेडफोन टाकून संगीत ऐकत होतो. निशा आली आणि माझ्या पाशी येऊन बसली

तिला काय बोलावे बहुधा हेच काही तिला सुचत नसणार. मी खूप वाट बघितली तिची की ती काहीतरी बोलणार म्हणून पण तिच्या कृतिवरून, आणि अंधारात दिसत असलेल्या अस्पष्ट मुद्रेवरून असं वाटत होतं की केलेल्या प्रत्येक कृतीबद्दल तिला आता जाणीव झाली होती. पण सॉरी तरी म्हणेल असं वाटत होतं. शेवटी मुकाट्याने उठून ती चालली गेली.

मला वाटते त्या दिवसापासून मी ज्या निशाला बघितले होते ती ही निशा नव्हती. कारण तेव्हापासून मी तिला वाद करताना कधी बघितलेच नव्हते. तिच्यात फार परिवर्तन आला होता. कुठे बाहेर जायचं असलं तर हक्काने विचारपूस करायची?जणू आता माझी मैत्रीण झाल्यागत ती कसल्याही गोष्टी शेअर करू लागली होती. आता असं वाटत होतं की तिच्यात जणू नवचैतन्य बहारलं होतं.

त्या दिवसांत अंगातली ताकद कशी काय वापरायची याचं प्रशिक्षण फार प्रमाणात झालं होतं. म्हणजे सकाळी सगळ्यांचा शिदोरीचा डब्बा नेऊन देताना हलकेच हातातील कुऱ्हाड लाकडावर मारून बघायचो. पहिल्यांदा जमत नव्हतं पण कालांतराने हळूहळू मीच लाकडे तोडू लागलो. इतक्या दिवसांचां राहणीमान असताना सुद्धा माझ्या दैनंदिनीत फारसा बदल आलेला नव्हता. बोलण्यात किंवा वागण्यात मी जसा गावी होतो तसाच इथे पण होतो.

पण एक होतं. आता मला पूर्ण घर आपलंसं वाटायला लागलं होतं. आणि खरं सांगायचं म्हणजे मला निशाबद्दल आता आकर्षण वाटायला लागलं होतं. हळूहळू का होईना पण माझ्या प्रत्येक बोल्यात नीशाचा नाव आता वारंवार येत होता. कारण जेव्हा  ती माझ्या विरुद्ध बाजूने होती तेव्हा तिच्या बद्दल माझ्या मनात फक्त एक द्वेष होता. ज्यामुळे तिच्याबद्दल कसलीच जाणीव किंवा कसलीच भावना नव्हती. ज्यामुळे मी आजपर्यंत तिच्यापासून दुरावलो होतो. पण जेव्हा आता ती माझ्यासोबत असते, हसते, बोलते काय कारण असेल तेव्हा माझ्या मनात फार वेगळीच फिलिंग येते. कारण पूर्वी रागाने अबोल असणारी निशा आता सगळयांसोबत बडबड करत असते. पण एक होतं जेव्हा कधी मी तिच्याकडे बघत होतो मला मयुरी विसरत चालली आहे असच वाटत होतं.

त्या दिवशी गप्पा मारत असताना निशाने काही अनाहुत प्रश्न विचारले..

काय शेखर कॉलेजला आहेस... मग कुणी गर्लफ्रेंड मिळवली असशील ना एखादी?

काय बोलतेस तू... मी तुला त्यातला वाटतो काय ?

बघ बघ लपवू नको..

अग लपवत नाही आहे... पण मी त्यातला नाही आहे..

वाटलच होतं.. कारण तुला एखादी मुलगी मिळेल असं वाटत पण नाही आहे...

का बरं असं?

कारण तुला बोलताच येत नाही.. सतत भित असतोस.. बघ ना आता.. इतके दिवस विरोधात असूनही स्वतःचीच हार घेत होतास. पण कधी मीही जिंकावं असं वाटलं काय तुला?

अग पण तिथला आणि इथला काय संबंध?

हो आहे... संबंध आहे... किती मुलींना तू बोलला असणार... मला तर वाटते की माघारच घेतली असणार...

चांगलं अनुभव आहे वाटतं तुला..

मग... मी पण पेलवून सोडले... पण हाती कुणाच्याच नाही आले..

मला त्यात इंटरेस्ट नाही...

बरं मला सांग... मी तुला कशी वाटते?

कशी म्हणजे... जशी आहेस तशीच वाटतेस!!!

तसं नाही रे... तुझ्या बाबतीत सांग.. मला कशी असायला हवे... ?

तू आधीचीच बरी होतीस... चिडखोर, भांडखोर... आता नुसतं डोकं खाऊ झालीस.. चल जाऊ दे

उन्हाळा आता संपायला आला होता. पण तरीही बाहेर कडाक्याचं उन पडत होतं. आणि आता लग्नसराईचा शेवटचा महिना चालू होता. कुठे गोंधळ तर कुठे वर्दळ असा प्रशस्त डिजेचा पेहराव कधी कधी ऐकायला यायचा.

आजोबांची आमराई फार विशाल होती. त्यामुळे त्यांना नेहमी आंबा विकण्यासाठी बाहेरच जावं लागायचं. दोन दिवसांतून किंवा चार दिवसांतून एकदाच ते घरी येऊन भेटत असत.

फावल्या वेळात माझं लिखाणही चालू असायचं. त्यामुळे कधी कधी शब्दांची यमक जुळवून कविताही करायचो. प्रत्येक गोष्टीत ती मला मदत करायची. कविता करताना अचूक शब्द ती शोधून द्यायची. आवड निवड करताना हळू हळू मी निशाच्या स्वाधीन होत चाललो होतो. तिचा हात हातात घेत कसलीही अपेक्षा न करता तीच्यामय होत होतो. कसलाही वचन न देता तिच्याशी तिच्या भावनांची देवाणघेवाण करत होतो. सगळं कसं अनपेक्षितपणे घडत असल्यासारखं वाटत होतं. पण खरी ओळख तिची त्या दिवशी झाली ज्या दिवशी मी गावाकडे निघालो होतो.

कॉलेजची चालू व्हायची वेळ आली होती. नवीन क्लासेसची तयारी पण चालू करायची होती. निघतो म्हणताना मामा मामीला किंवा अजोबाला जितकं दुखः झालं नाही तितकं निशाला सोडताना झालं होतं. आणि तेव्हाही तिच्या डोळयांत डोळे घालून बघायची माझी हिम्मत होत नव्हती. बसस्टॉपपर्यंत तो पहिला प्रवास असेल जो निशा सोबत मी निशब्द पणाने केला होता.

सावकाश पावले टाकत जेव्हा बसस्टॉपवर पोहचलो तेव्हा अचानक निशाने हातात हात घेत विचारले... शेखर जेव्हापर्यंत तू होतास तेव्हा पर्यंत मला तुझी कदरच करता आली नाही. पण आज जेव्हा तू जात आहेस. हृदयाची काहीतरी चूकचूकल्यासारखं वाटत आहे. ह्या भावना अबोल जरी का असल्या तरी त्या तुझ्यापासून लपलेल्या नाहीत. कळत नाहीत काय बोलायचे ते

पण आज इतक्या दिवसांनी पहिल्यांदा तू गावात आलास आणि वाटलच नाही इतकं तू आपलंसं करून गेलास.

यानंतर कधी येणार की नाही येणार तेव्हढ मला माहित नाही पण जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आठवणीने ये.. मी तुझी वाट बघत असलेली असेन. आणि असे म्हणून ती बस यायच्या आधीच निघून गेली.

आज पहिल्यांदा निशाला असं माघार देताना पाहून मी विचलित झालो होतो... कदाचित तिच्या वेदनांना न समजून तिच्यावर केलेला हा अन्याय तर नाही असं वाटत होतं. मनात तिच्या स्मृतींचा अगम्य अल्बम घेऊन मी गावच्या परतीकडे जातच राहिलो.

## ९) शेवटी प्रपोज केला...

आज गावी येऊन २ ते ४ दिवसे झाली होती. पण मी अजून घराच्या बाहेर निघालो नव्हतो. सतत निशाची आठवण येत होती. या वेळेला आपण काय करत असू? आत्ता या वेळेला ती माझ्या सोबत होती! कसले कसले भास व्हायचे. सध्यातरी माझ्या ओठावर निशाचेच गाणे चालू होते. त्यामुळे आईसमोरही बोलायचं असलं तरी तिचंच नाव बऱ्याचदा यायचं.

माझं असं तिचं नाव घेणं हे आईलाही आश्चर्यच होतं. पण काय नातं होतं हे?.. ज्याने मयूरीच्या नात्यालासुद्धा मागे टाकले होते. जिला अव्हेरण्यासाठी मी बाहेर गेलो होतो. आज तिला टाकूनच आलो की काय? असं वाटत होते.

रोजच्या सारखं सजून सावरून आज थोडंसं बाहेर निघालो होतो. सगळयात आधी दिग्याकडे जाऊन बघितलं. दारात बसून तोही जुते सावरत होता. म्हणजे कुठेतरी जाण्याच्या तयारीतच असेल. मला बघितलं आणि म्हणाला.. अरे केव्हा आलास? आणि आलिंगन दिलं. दोघेही मिळून मग मयूरीच्या घरासमोर असलेल्या टपरीकडे आलो. एव्हाना अमितही तिथे येऊन पोचला होता.

काय म्हणते गावकडली हालचाल?

मजेत!!...

मग काय त्या कॉलेजच्या गोष्टी परत चालू झाल्या. पण माझी नजर ती मयूरीच्या घराकडे वळून होती. जिचं कुतूहल म्हणून रोज तिला बघत असायचो. पण सगळी दारेही बंद, खिडक्या

बंद, इतक्या दिवसात तर गेटच्याही कुणी आत गेलं नव्हतं. कुठेही तिचा मागमूस नव्हता. मित्रांना विचारलं... अरे मयुरीबद्दल काही माहिती मिळाली काय? तर कोणालाच तिच्याबद्दल काही माहित नव्हते.

असेच काही दिवस निघून गेले. कधी कधी फोन करून निशा मला गावाकडली गम्मत जम्मत सांगत असायची. पुन्हा एकदा सगळया मित्रांचा पेहराव जमायला लागला. कॉलेजचे ते नवीन दिवस पुन्हा एकदा चालू झाले.

मागे सांगितलं होतं. कुणावर तरी माझी फार तीक्ष्ण नजर होती. पण पुरावा मिळत नसल्यामुळे मी त्यांना काहीच म्हणू शकत नव्हतो. आणि आमच्या ग्रूपच गुप्त आणि तेच बेस्ट प्रकरण होतं आशा आणि अमितच. पण कुणालाही त्याची कानोकान बातमी नव्हती.

मी अमितचा इतका जवळचा मित्र होतो पण मलासुद्धा काहीच माहिती नव्हतं. त्यांची रोज अंडेलकरच्या क्लिनिक समोर भेट व्हायची. मी दोन तीनदा त्यांना बघितलं. आधी वाटलं आम्ही फ्रेंडस आहोत त्या निमित्ताने भेटत असतील. पण जेव्हा भेटीगाठी सोबत देवाणघेवाण सुद्धा नजरेत यायला लागली तेव्हा कुठे या सगळयाची जाणीव झाली.

या गोष्टीचं उल्लेख मी सूनैनाला सांगितलं होतं. आणि दाखवलं पण होत. त्यामुळे सगळयांची पाळत होतीच आणि आज सगळे मिळून त्यांचा योग्य विल्हेवाट लावण्यात येणार होतं. पण जो आमच्यात सगळयात कॉमेडी व्यक्ती होता. त्याने एक वेगळीच शक्कल लढविली.

त्या दिवशी रोजच्या सारखे आम्ही अन्नपूर्णा मध्ये बसून होतो. पण आज सगळेच निशब्द होते. कारण जो ने त्या प्रत्येकाची खबरदारी घेतली होती. दिग्याने पेपर वाचल्याचं बहाणा करत म्हटलं..

ह... ह... आजच्या ठळक ठळक बातम्या... आज सकाळी अंडेलकर क्लिनिक समोर झाली दोन प्रेमी युगुलांची भेट..

अरे दाखव... म्हणत तोच पेपर जो ने हिस्कावला आणि परत वाचू लागला.

आणि सोबत प्रियकराने दीली चॉकलेट आणि ग्रिटींग्ज प्रेयसीला भेट..

परत तोच पेपर सूनैनाने घेतला आणि वाचू लागली..

प्रेयसीचा हात हातात घेत ओठांनी घेतलेलं किस आणि उद्या परत भेटण्याचं दिलेलं आश्वासन...

क्षणभरात ज्याला जे समजायचे होतं ते तुरंत समजून गेले होते. अमित म्हणाला मला काही काम आहे आणि मी चाललो. मागोमाग आशाही उठली आणि घरी काम आहे म्हणत निघू लागली.. शेवटी मीच म्हणालो..

जे बघा सभा आता भरलीय. आणि नायक पळ काढतोय... काय रे.. पाखरांनो... खोटे निमित्त करून पळ काढताय... चहाची ऑर्डर कोण देणार? बसा आपापल्या जागेवर?

त्यांची ती केविलवाणी चेहरी बघून सगळे हसायला कमी करत नव्हते. आणि त्यांच्या नजरा मात्र खाली जात होत्या. मग परत एकदा मी चिडल्यासारखा त्यांना म्हणालो...

अरे माना कशाला खाली घातलाय? काही वाईट नाही केलंय तुम्ही.. पण जे आज तुम्ही आमच्या पासून लपवताय तेच उद्या आई वडीलांपासून लपवाल. मग अशा प्रेमाला काही अर्थ... अरे लपवतच राहाल तर जाहीर केव्हा कराल... बसा खाली.. ( आणि दोघेही खाली बसली. )

काय सीन आहे यार.. चोरी चोरी चुपके चूपके २ चा सिक्वेल तयार झाला. जो म्हणाला. ( आणि परत सगळे हसायला लागले. )

मी काय म्हणते आता पार्टी तर व्हायलाच पाहिजे... कारण आपल्यात आता एक प्रेम युगल जोडपं बसलं आहे... सूनैना म्हणाली..

नको तेव्हढी थट्टा मस्करी झाल्यानंतर शेवटी अमित आणि आशा बोलू लागली.

आम्हाला माहीत आहे की आम्ही दोघे तुमच्यापासून खूप काही लपवले आहे. पण सांगायचं कधी नव्हतं असं नाही.. मी लवकरच सांगणार पण होतो. बरं शेखर.. आता तूच म्हणतोस की प्रेम लपवणे ही चुकीची गोष्ट आहे मग जेव्हा तू मयुरीवर इतकं प्रेम करत होतास तर मग का नाही बोललास...

काय पॉइंट पकडलं यार अमित... पुरेपूर घातक हमला... साल्युत.. जो म्हणाला..

ह.. बरोबर.. सूनैना म्हणाली

ह... विचार करायला काहीच हरकत नाही. कारण मलाही पटलं.. दिग्या म्हणाला..

आम्हाला आमची चुकी मान्य आहे... पण काय शेखर उत्तर देणार... शेवटी जोर लावत आशा म्हणाली..

मीही मग थोडं मजेत म्हटलं.. बस इतकंच ना.. ठीक आहे.. बोलेन आता.. पण मयुरी आहे कुठे? कॉलेज सुटलं.. कुठे गेली.. काय झालं.. नाही तिचा अत्ता पत्ता आणि नाही तिचा ठाव ठिकाणा.. तेव्हापासून ती अजूनपर्यंत भेटलीच नाही..

मी बोलून तर गेलो होतो.. की मी तिला विचारणार म्हणून.. पण काय माझी हिम्मत होणार... की निशाने सांगितल्यानुसार मी भित्राच राहणार. पण अचानक लक्षात आलं की लेटर वर तर तिने अगदी स्पष्ट सांगितलं होतं की कॉलेज चालू व्हायच्या अगोदरच ती येणार म्हणून. जर मग ती आली असेल तर मग आता कुठे.. आत्तापर्यंत दिसली का नाही...

## १०)परत एकदा अन्नपूर्णा....

स्मिताच्या लग्नाचे फोटो बघता बघता मी भूतकाळात इतका विरून गेलो की मला वास्तविकतेची जाणीवच राहिली नाही.अचानक ऑफिसमधून रिताचा फोन आला.काही मीटिंग विषयी ती बोलत होती आणि मी फक्त होकार देत होतो.कारण मुळात मीच बोलतोय की नाही हेही मला कळत नव्हते.

खूप वेळपासून आतमध्ये असल्या कारणाने थोडे फ्रेश होण्यासाठी मी बाहेर आलो.इतक्यात परत एकदा अमितचा फोन आला..

हाय शेखर

हा...अमित बोल

अरे हा...तुझ्याशी एक काम होतं..

बोल ना.. कोणतं काम आहे ते..

ते असं फोनवर सांगता यायचं नाही..तू फक्त अन्नपूर्णाला ये..

बरं निघतो मी..

वाटल्यास आरामात ये आणि जवळपास आल्यावर कळव तसं..ओके बाय..

बाय करत मी फोन ठेवला.आणि मोबाईल खिशात टाकून ऑफिसकडे जायला निघालो.पण कार जवळ येताच पुन्हा एक फोन आला.त्यावेळी तो वडिलांचा फोन होता.आता इतकं सगळं झाल्यावर पुन्हा हे कशाला फोन करत आहेत असं म्हणून मी फोन उचलला.

कुठे आहेस रे तू?

ऑफिस मध्ये आहे.( थोडंसं रागातच)

उद्या सत्यनारायणाची कथा आहे...उदयातरी येशील काय?

बघेन...

सगळे आशेने बोलावत आहेत तुला.त्यांची अपेक्षा अशी मोडू नकोस.ठेवतो फोन..

कार चालू केली आणि हायवेला लावली. बाबाचं राग नाही आलं पण त्यांनी ज्यांच्यासाठी मला बोलावणं केलं होतं.आज त्यांना मला बघायचं होतं.आणि आत्ता त्यांना माझी गरज पडली होती.पण गेली १० वर्षे मी कसा आहे? कुठे आहे? कुणी जाणून सुद्धा घ्यायचं ठरवलं नव्हतं.असल्या खोट्या नात्यांपेक्षा मी एकटाच बरा..असं म्हणत गाडी अन्नपूर्णा कडे वळवली.

पण एक समजत नव्हतं.इतक्या दिवसांनी मला अमितने अन्नपूर्णा मध्ये कशाला बोलावलं असेल.घरी पण बोलावू शकत होता.आणि इतक्या महत्त्वाचं कामही कोणतं असेल जे फोनवर बोलता येणार नव्हतं.की मागच्या सारखं तर पुन्हा काही करणार नाही ना...आणि परत मी भूतकाळात चाललं गेलो.

---

परत एकदा भूतकाळात...

त्यादिवशी सलग कॉलेजला चार दिवसाच्या सुट्ट्या होत्या म्हणून प्रत्येक जण आपापल्या कामातच रमून होते.अचानक अमितचा फोन आला..

अरे शेखर..काय करत आहेस रे...

काही नाही...नवीन झाडांची माहिती बघत होतो...

जरा अन्नपूर्णा कडे ये...काही काम आहे..

सांग ना कोणतं काम आहे ते..

अरे असं फोनवर नाही सांगता नाही येणार..तू लवकर अन्नपूर्णा कडे ये.

बरं येत आहे..

कशाला बरं अन्नपूर्णा कडे बोलावलं असेल असा विचार करून मीही जरा घाईघाईनेच तिकडे निघालो.गेटच्या आत जाताच बघितलं सगळे दारात बसून माझीच वाट बघत होते.सगळयांचा चेहरा मात्र निशब्द होता.जणू कुणी अनंतात गेल्या सारखं.सगळयांचं तसं अवतार बघून.. नेमकं काय झालंय आणि काय नाही? मलाच काही कळत नव्हते.

शेवटी सगळेजण एकदम उत्साहात बोलले.आमच्या लाडक्या शेखरसाठी आम्हा सर्वांकडून एक आगळीक भेट..आणि सगळे जण एक एक करीत बाजूला होऊ लागले.आणि त्यांच्या मागे दडून बसलेली मान खाली घालून असलेली मयुरी निदर्शनास आली.

मी एक क्षण तिच्याकडे बघतच राहिलो..लाजेने मान खाली घालून..चेहऱ्यावर तेच गढ जिंकल्या सारखं स्मित आणून..कुणाच्यातरी आठवणीत दाटलेली..हृदयात स्पंदने साठलेली..तिथे हळुवार साजेशी उभी आहे.आणि बघताक्षणी मी परत तिच्या प्रेमात पडावं असं मला झालं होतं...

क्षणाचाही विलंब न लावता तिच्या नजरेच्या शिड्या चढू लागलो.आणि जसजसं अमित आणि आशाशी ठरलं होतं तसंच हळूच मयूरीच्या पुढ्यात सामोरी झालो.

मयुरिने लाजून आपले डोळे केव्हाच बंद केले होते.हळूच तिच्या केसांवरून हात फिरवत तिचा हात हातात घेतला आणि मी गुडघ्यावर बसलो.तिरपी मान करून तिच्या डोळयात बघताना आज ती डोळयांनीच स्पष्ट बोलत होती.मग हळूच तिचा हात आपल्या ओठांशी लावत जरा प्रेमाने तिला विचारलं..

इ स्टील लव यू मयुरी,अँड विल यू मारी मी.

इतकं बोलताच मित्रांमध्ये उत्साह खवळला आणि ते जोरजोरात शिट्ट्या मारू लागले.आणि आपला आनंद व्यक्त करू लागले.हे सगळं बघून मयुरी इतकी लाजली की धावत धावत आत् मध्येच गेली.आणि ठरल्या प्रमाणे पार्टीचा ओझा अमित आणि आशा वर येऊन पडला होता.हे सगळं झाल्यावर प्रत्येकालाच बोले तैसा चाले चा अभिमान वाटायला लागला होता.कितीतरी दिवसांनी आज रिकामी खुर्ची भरून दिसत होती.

अन्नपूर्णा मध्ये असताना मी मयुरीला विचारलं..इतके दिवस कुठे होतीस ग? लेटर वर तर आधीच येणार म्हणून सांगितलं होतं..

अरे बाबांनी येऊच दिलं नाही.नंतर कधी येणार म्हणून त्यांनीच माझी तयारी कॅन्सल केली. तसं त्यांनी मला तिथेच राहायला सांगितलं होतं पण मला तुझ्याशी भेटायचे होते म्हणून मग नकार दिला.

बरं मग आता काय ठरवलं आहेस..

काही नाही छोटी मोठी मार्केटिंग करते म्हणत आहे..काही जगापण बघितल्या आहेत.

बरं आहे..मला कमाई करण्याची गरज नसणार..( आणि एकमेकांच हसू असं ओठावर फुलू लागलं.)

थोडीफार थट्टामस्करी करत आमचं हे प्रेम प्रकरण चालत होतं.पण त्यातच माझ्या घरी एक वेगळाच प्रकरण चालू होतं.

मी जेव्हा आजोबांच्या गावाकडे असताना माझ्या मनात भरलेली निशा हे आईने पूर्णपणे हेरली होती.आणि घरची मुलगी घरी येणार म्हटलं की सगळे खुश राहतील असा आईचा विचार होता.आणि निशासाठी मुलगा शोधा म्हणून तिच्या वडिलांनी आधीच आईला विचारले होते.

आईने माझ्या निशामय असताना आधीच तींचे स्वप्न रंगवले होते आणि म्हणून मला न विचारता निर्णय पक्का करून तिने मामाला सांगितलं पण होतं.पण मला या बद्दल काहीच माहिती नव्हती.आणि या सगळ्यात जर कोणी खुश असेल तर ती निशाच होती.कारण मी तिला गर आवडायला लागलो होतो.आणि तिच्याही मनात मी तिच्या सोबत असल्याचा भास देत होतो

## ११) गैरसमजा...

कॉलेजचं संपत आलेलं वर्ष आणि आमची वाढत जाणारी भेट.प्रेमात माणूस इतका हरवतो की त्याला इतर जगाची कसलीही जाण नसते.फक्त सुचते तर ती आणि तो.पण आता तिलाही बंधनात यायचं होतं कारण हे कुठपर्यंत चालणार होतं?त्यादिवशी पार्कमध्ये असताना आम्हा दोघांची हीच चर्चा चालली होती.

शेखर आपलं हे असं किती दिवस चालायचं...

म्हणजे काय म्हणायचं तुला...

म्हणजे आपण असं लपून चोरून अजून किती दिवस भेटायचं...तुला नाही का वाटत की आता आपण संबंधात यायला हवं..

माझाही तोच प्रयत्न आहे...पण इतक्यात नको...कारण जो उत्साह आपल्याला ज्या मोकळेपणात व्यक्त करता येतो.नंतर संसारात ते लुप्त होत असते.लग्न नाही करायचं असं मी नाही म्हणत आहे पण कॉलेज सुटल्यावर बघू ना,निदान तोपर्यंत तुझ्यात मी...माझ्यात तू चालू दे..

ते सगळं ठीक आहे पण उद्या काही वेगळं नको व्हायला..

तुझं माझ्यावर किती विश्वास आहे..

माझ्या जिवापेक्षा जास्त जपते रे तुला..

मग ठरलं तर...नो टेन्शन,नो इमोशन आता फक्त ओन्ली रोमान्स..

ती कितीदा मला अव्हेरण्याचा प्रयत्न करत होती.पण वासनेच्या आहारी गेलेला मी ते टाळून देत होतो.

प्रेमात असं कित्येकदा होतं.प्रेमाच्या शिड्या चढून झाल्या की सगळयात आकर्षण असते ती शारीरिकतेची.आणि एकदा तोंडाला लागलेलं सुख त्याची पूर्ती झाल्याशिवाय मान्यता देत नसते.त्यात नसतो नकार आणि नसतो कुणाचं विरोध.फक्त वाहवत जाणे असते प्रेमाच्या अथांग सागरात.शारीरिकतेचं अमाप सुख त्या कोवळया वयात काय असतं असं कित्येकांना कळत नसते.आणि हेच सगळं माझ्याबरोबर झालं होतं.

असं कितीदा घळत होतं,पण त्याची चिंता होती कुणाला.आणि आता कॉलेज पण सुटायला झालं होतं.पण जेवढं ते टेन्शन मला कॉलेजला सुटण्याच नव्हतं तेव्हढ टेन्शन त्या दिवशी मयुरी आल्यावर झालं होतं...

शेखर आता कॉलेजपण सुटायला लागलाय..तुला योग्य तो निर्णय घ्यायला हवा..

ओह्...शीट..तू का अशी वागत आहेस ग..आपण काढू नं ग मार्ग त्याच्यावर काहीतरी..

केव्हा मार्ग काढशील शेखर..माझं जीव गेल्यावर...

तू कशी बोलत आहेस..काही झालंय का?

त्यामुळेच तर आज निर्णय घ्यायला आली आहे.नाहीतर आत्महत्या करण्या पलीकडे माझ्याकडे पर्याय नाही.( आणि ती रडायला लागली.)

ए प्लीज असं नको बोलू...काय झालं तेव्हढ सांग आधी बरं..

काल रात्री अचानक उलटी चालू झाल्यावर आईनी मला दवाखान्यात नेलं.तेव्हा कळलं आईला की माझ्या पोटात तुझ्या नावाचं ३ महिन्यांचं बाळ आहे..आईने खूप विचारलं..रात्री खूप मारलं पण..पण मी नाव ओठावर येऊच दिलं नाही.. मात्र आता तुला निर्णय घ्यायलाच हवा...

क्षणभर मला काय बोलावं तेच काही सुचत नव्हते.कारण एका अर्थी तिचं बरोबरच होतं.माझ्या सुखाच्या उपभोगात मी तिचा एकदाही विचार केला नव्हता.आणि तिच्या त्या प्रसंगाला मीच कारणीभूत होतो.परंतु वेळ गेलेली चालणार होती.माझ्या वासनेच्या आहारामुळे

मी एका जीवाचा नाश करावा तेव्हाही मला असं वाटत नव्हते.आता एकच पर्याय होता..लग्न...आणि तेही लवकरच.

सगळया मित्रांना एकत्र बोलावलं.सगळयांना त्याबाबत विचारपूस केली.पण कुणीही मला उलट बोलले नाहीत.कारण झालेल्या प्रकरणावर मी फार गंभीर वक्तव्य करत होतो.सगळयांनी लग्नाची मंजुरी दिली.

सगळयांनी गुप्तपणे ती तयारी केली होती.त्यामुळे आम्हा दोघांपैकी कुणाच्याही घरी काहीच माहीत न करता कोर्टात जाऊन लग्न केलं.परत एकदा सगळयांनी जल्लोष केला.शेवटी आम्ही एकत्र आलो याची जाणीव सगळयांनी पार्टीतून दिली.मला वाटते मयुरी सोबत घालवलेली ती शेवटची पार्टी असेल.

लग्न तर मित्रांनी लावून दिलं.पण खरी भीती होती ती मयुरिला घरी घेऊन जायची.कारण जशी मयुरिची आई कन्व्हेन्स झाली तशी माझी आई होणार नव्हती...

त्या दिवसात निशाचं आणि माझं लग्न व्हावं म्हणून माझ्या घरी नको नको ते प्रयत्न चालू होते.मामामामी,आजोबा आणि निशा सगळी विचारपूस करायला घरी आली होती.सगळयांनी आज ती योग्य ती बैठक घ्यायची ठरवली होती.त्यात मी घरी नसल्यामुळे निशा मला बघण्यासाठी फार उत्स्फूर्त झाली होती.आणि आज घरचे पण सगळे खुश होते.फक्त माझी कमी पूर्ण करण्यासाठी सगळे माझी वाट बघत होते...

______________________________________________________________प

रत एकदा वास्तविकतेत परत येताना....

केव्हा एकदाचं गाव आलं ते कळलंच नाही.कारमधून उतरलो आणि गेटच्या आत पाऊल टाकले.दरवाज्यावर कुणीच दिसले नाही.म्हणून अन्नपूर्णा कडे जाऊ लागलो.कोण कोण असेल या संदर्भात मी आत गेलो.आणि बघून आश्चर्यचकीत झालो.

सगळे मित्र बाजूलाच उभे होते.आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्मिता तिच्या भावी नवऱ्यासह तिथे बाजूलाच उभी होती.तिच्या बाजूलाच मावशीपण होती.आणि एका बाजूला मयुरीचे आईवडील आणि त्यांच्या सोबत माझेपण आई वडील होते.सगळयांना बघून माझ्यासाठी तो एक आश्चर्याचा धक्काच होता.कारण काय घडतंय आणि काय नाही मला हेच कळत नव्हते.मी फक्त स्तांधपणे एका जागी उभे राहून सगळयांकडे बघत होतो.

अचानक मागाहून आलेली निशा माझ्या पुढ्यात उभी झाली.तिला बघताक्षणी माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली.कारण इतक्या दिवसांत होणारी वादळे येण्याचं मुख्य्य कारण म्हणजे तीच होती.एकदा पुन्हा हे अगदी जसेच्या तसेच होते.सगळेजण अगदी त्या दिवशी सारखेच गोलाकार उभे होते.आणि परत त्या दिवसाची चित्र अशी डोळयासमोरून जाऊ लागली.....

## १२) एकमेकांचा निरोप...

त्यादिवशी लग्न झालं पण माझी घरी जायची इच्छा होत नव्हती.एक तर घरी असलेली नीशा आणि माझ्यासाठी बसलेली बैठक ही मला माहित नव्हती.आणि दुसरी म्हणजे ही धक्कादायक बातमी.कारण प्रत्येक आईबापाला वाटते की आपल्या मुलांचं लग्न हे चारचौघात रीतिरिवाजाने धुमधडाक्यात व्हावे.

मित्रांसोबत सगळे घराच्या समोर आलो.पण कुणाचीच आत जायची तयारी होईना.मग मित्रच म्हणाले जे काही सांगायचं आहे आधी तूच सांगून ये.कारण ज्या परिस्थितीत हे झालंय ही तुझीच चुकी आहे.पुन्हा मयुरीच्या डोक्यावर ताणतणाव नको.पण मग शेवटी मयुरिच यायला तयार झाली.तिच्या चेहऱ्यावर ओढणी झाकत सगळे घरी पोहचलो.

दारातूनच निशाने मला येताना बघितलं होतं.धावतच तिने मी घरात आल्याची वार्ता सगळ्यांना कळविली.आई बाबा सगळे बाहेर आले.त्यांच्या मागोमाग मामा मामी आणि आजोबा सगळेच बाहेर आले.सगळ्यांच्या चेहऱ्यावर मला बघून एक स्मित पसरत होतं.पण काय घडत आहे याची मला पुसटशी देखील कल्पना नव्हती.

शेवटी आईचं म्हणाली...आलेत का सगळे... बरं का बाळांनो..आज शेखरसाठी फार महत्त्वाचा दिवस आहे.सगळे वीश नाही करणार का त्याला?

कश्याबदल काकू? जो म्हणाला...

अरे आज शेखर आणि निश्याच्या लग्नाची बैठक घ्यायची आहे.आहे का नाही खास..

पण मी काय म्हणतो आई ? मी जरा अडखळत मध्येच म्हणालो..

अरे आता काही बोलू नकोस...जा तुम्ही आता..निवांत गप्पा मारा...आई म्हणाली

खरतर निशाच्या चेहऱ्यावरचे ते भाव बघून मला तिला नकार द्यावा असं कधी वाटत नव्हतं.कारण एके काळी तिच्याच स्वगुनावर मी भाळून तीच्यामय झालो होतो.आकर्षण हे काय असतं शेवटी तिनेच हे दाखवलं होतं.शिवाय माझ्यातही बरेच बदल आणले होते.आणि स्वतातही.पण हे ही खरंच होतं की आधीपासून मी मयुरीचाच होतो..आणि आत्ताही मी तिचंच आहे.

सगळयांच्या तोंडी माझं आणि निशाच नाव असं वारंवार येत होतं.ज्यामुळे माझ्या मनात एक भयंकर संताप उठला होता.आणि मी जरा जोरानेच ओरडलो..

प्लीज थांबवा हे सगळं..आणि सगळे कसे स्तब्ध पणाने माझ्याकडे बघू लागले होते...पण जेव्हा..काय रे? काय झालं? असं म्हणत आई माझ्यापाशी आली तेव्हा मी बोलू लागलो...

आई ....लग्न झालंय माझं!!!!

आणि हे एक वाक्य बोलताच सगळयांच्या चेहऱ्यावरची मुद्रा आपोआप निस्तरल्यागत झाली होती.आत्तापर्यंत चालू असलेला गोंगाट.निरव शांततेत सामील झाला होता...कुणाला काय बोलावे काहीच उमजत नव्हते..सगळे फक्त टकमक एकमेकांचे चेहरे बघू लागले होते.

इतका मोठा निर्णय..आणि तेही आम्हाला कुणालाच न सांगता..इथे आम्ही याच्या लग्नाची तयारी करतोय आणि हे कार्ट येऊन सांगताय की त्याचं लग्न झालंय म्हणून..आई वडीलांकडे बघून बोलत होती.

आई ....आई ...मला कुणाचच असं मन दुखवायचं नव्हतं ग..जे झालं त्याला कारणही तेवढच मोठं होतं ग...

तू जे केलंस ते तुला ठीक वाटते ना..अरे बघ त्या पोरीकडे..किती मजेने वावरत होती इकडे तिकडे..तू केव्हा केव्हा येणार म्हणून तुझी आतुरतेने वाट बघत होती..आता काय सांगू तिला?

आणि खरंच निशा रडवेली होऊन सगळं बघत होती.यात तिचीही काही चूक नव्हती.जेव्हा मयुरीवर् प्रेम करून मी तिच्यावर मोहित होऊ शकतो तर मग ती का नाही.आणि तिच्यासमोर मी कधी मयुरीचं उल्लेख सुद्धा केला नव्हता.आणि तीलासुद्धा काय माहित होतं की त्या बिचारीच्या वाट्याला असं हे सगळं येणार म्हणून.

खरतर हे चुकीचंच होतं पण मी ज्या जागेवर होतो त्या जागी मला माझंच बरोबर वाटत होतं.मला आई बाबा जे बोलत होते त्यांचं वाईट वाटत नव्हतं कारण त्यांना हक्कच होता माझ्यावर रागवायला.पण खरं तर मला निशाच राग आलं ते आजतागायत.

प्रेमासाठी कुणाला सिमाबद्ध होताना बरेच जणांना बघितलं होतं पण कुणाची आवड आपल्याला इतकी खाली खेचू शकते ह्याची जाणीव नव्हती.आत्तापर्यंत जिला आपण साधीभोळी बिचारी म्हणत होतो.मला मिळवण्यासाठी ती कोणत्या शिगेला पोचणार होती हेही ठावूक नव्हते.

अचानक सगळे बोलत असताना निशा माझ्या जवळ आली.खाली मान घालून असलेला मी हळूच तिच्याकडे नजर टाकली. सपकन तिने माझ्या कानाखाली हाणली.सगळे एकदम मंत्रमुग्ध झाले.आत्तापर्यंत होणारा वादविवाद पूर्णपणे नजर रोखून आमच्या दोघांवरच होता.मला वाटलं झालेल्या प्रसंगामुळे तिचं मन तुटलं म्हणून कदाचित राग म्हणून उतरलेलं थापड असेल असं मला वाटलं.पण जेव्हा ती बोलायला लागली तेव्हा मलाच शारमल्यासारख वाटत होतं.

.आणि ती बोलतच होती..

वाटलं नव्हतं तू असा निघशिल म्हणून.तुझ्यावर विश्वास ठेवला कारण तू असा परका नव्हतास म्हणून.पण शेवटी परकेपणा दाखवलाच.इतके दिवस माझ्याशी वासणेन भरल्या डोळ्यांनी माझ्या शरीराचे लचके तोडलास.तेव्हा तुला आनंद वाटत होता आणि आज जेव्हा नातं जुळायची वेळ आली तर लग्न कुणा दुसऱ्या सोबत.हीच तुझी माणुसकी..इतका वासनेच्या अधीन

असशील म्हणून मला कधी वाटलं नव्हतं..छे अख्ख्या जीवनाचं केलं माझ्या तू..आता जगून तरी काय उपयोग..त्यापेक्षा मेलेलेच बरे...

असं बोलत निशा आत धावत गेली.आणि तिच्या मागोमाग मामी,आई,आजोबा वगैरे गेले.पण मी कितीही खरं सांगायचं प्रयत्न केला तरी कुणाचा त्यावर विश्वास बसेना.जो तो मलाच वाईट बोलत होता.पण जेव्हा माझ्या मित्रमध्येही जेव्हा असंतोष निर्माण होताना दिसला तेव्हा मनात धकधक व्हायला आली होती.

काही वेळाने आई बाहेर आली.आणि म्हणाली..

शेखर..जे कृत्य तू केलंय ना..ते माफीच्या देखील लायक नाही.असं वाटतंय मुलगा म्हणून जन्माला घालणं आयुष्यात ही फार मोठी चूक झाली माझी.पण ठरलाय आता.सून म्हणून नीशाच आता माझ्या घरी राहणार.आणि जर तुला पटत नसेल तर तू जाऊ शकतेस.आता तू तिला सोडून दे किंवा काहीही कर..

धडधड बोलून आई आत निघून गेली.आणि मी विचार करू लागलो.काय स्वप्न घेऊन आली होतो घरी आणि एका क्षणात कायापालट झालं.एक चूक आयुष्याला कशी धोक्याची वळण लावते तसाच एक खोटं प्रसंग..आणि माझं आयुष्य हिरावून घेतलं.वचन दिलं होतं मयूरीला आपल्या प्रेमाचा प्रतीक माझ्या घरीच फुलणार म्हणून.पण आज तेही माझ्या हाताच्या बाहेर गेलं होतं.

सगळं इतकं अनपेक्षितपणे घडलं होतं की सगळयांना निशाच्या बोलण्यावर जितका विश्वास वाटत होता.तितका माझ्यावर नव्हताच मुळी.आणि या सगळयात मित्रांचं पण समावेश होता.आणि सगळयात महत्त्वाचं म्हणजे मयुरिला पण माझ्यावर संशय येत होता.

जेव्हा घरी कुणालाच माझ्या बोलण्यात असलेला खरेपण कळला नाही तेव्हा मी धावत मित्रांपाशी आलो.पण मला वाटतं त्यांनाही आज माझ्यापेक्षा निशाच खरी वाटली असावी.जेव्हा रडत रडत मयुरीपण जायला लागली.मी तिच्या मागे धावू लागलो..

मयुरी प्लीज थांब मयुरी.....मी तसं काही केलं नाही आहे मयुरी..प्लीज मयुरी...ऐक ना जरा माझं.

काय ऐकु तुझं..जे काही इतक्या लोकांत ऐकलंय तुझे पराक्रम..ते काही कमी आहेत का?

ती खोटी बोलत आहे मयुरी...मी तसा नाही ग..

इतक्या लोकांत एखादी मुलगी कधीच खोटं बोलणार नाही शेखर..मीच चुकले तुझ्यावर विश्वास ठेवून..

ऐक ना मयुरी मी आपल्या प्रेमाच्या प्रतिकची शपथ घेऊन सांगतो की हे सगळं खोटं आहे..

खबरदार जर त्याचं नाव घेशील तर... तो आता माझा मुलगा आहे.. कसंही करेन पण मी त्याला जन्म देईन..आणि तुझी सावली सुद्धा पडू देणार नाही त्यावर..

प्लीज मयुरी..माझ्यासाठी थांब ना..मी सगळं व्यवस्थित करेन ग...मी नाही राहू शकत तुझ्याशिवाय? प्लीज थांब ना...

जर तुला वाटतं ना शेखर की आम्ही असं सुखात राहावं तर प्लीज असं अडवू नकोस.आणि जर का प्रतीकला इतकेच मानत असशील तर तुला सांगतो कधीच आम्हापाशी येऊ नकोस.परत कधीच मला दिसू नकोस...चुकूनही..

ती जात होती.आणि तिच्या पाठमोरी मी तिला फक्त हका मारत होतो.स्वतःच्या प्रेमाची भिक मागत होतो.पण त्या वेळेस अख्खं जग माझं उलथ पालथं झालं होतं.शरीरात शक्ती नसल्यासारखं तिथेच रोडवर निशस्त्र हतबल होऊन खाली पडलो..कोसळलो.पण आज उठवायला ना मित्र होता ना कुणी नातेवाईक.फक्त ती एक छवी होती जी प्रत्येकाच्या नजरेतून उतरलेली होती.क्षणाक्षणाला मी कोसळून पडत होतो.

आता माझ्या जगण्याला काहीच अर्थ राहिला नव्हता.कधी वाटलं पण नव्हतं की इतकं एकटं पडेन म्हणून.त्या एका प्रसंगामुळे सगळं काही दुरावल होतं माझ्यापासून.स्वतःला इतका कोसत होतो की माझ्यासारखं दुर्भागी कुणी नसावा असं वाटत होतं.क्षणाक्षणाला तिची आठवण येऊन आतडी तीळ तीळ तुटायला लागली होती.आता कळून चुकलं होतं की माझ्या बाजूने राहणार कुणीच नव्हतं.

रात्र झाली...दिवस निघाला.क्षणभर सूर्याकडे बघितलं..त्याला त्याचा मार्ग माहीत होता.पण योग्य तो निर्णय मलाच घ्यायचं होतं.कुठे जावे कुठे नको काहीच कळत नव्हते.वाटत होतं आत्महत्या करावी..पण कुण्या गुन्ह्याने मरेन.कारण आज जरी मेलो तरी हेच खरं होईल.त्यापेक्षा या सगळयांपासून जितकं दूर जाता येईल तितकं दूर गेलेलं बरं असं समजून घराकडे गेलो.

घरी जाऊनही माझ्याशी कुणी बोलणार नाहीत हे मला माहीतच होतं.आणि तसच झालं.घरी जाऊनही प्रत्येकाच्या नजरेत जेव्हा मी शून्यात उरलो.बाग भरली ..म्हणजेच माझं सगळं अस्तित्व टाकून बॅगेत मी कुणालाच न दिसता न सांगता पळत सुटलो.पाय नेतील त्या दिशेने आणि रस्ता निघेल त्या वाटेने.

वेळेने सगळे दुःख भरून आणले होते.मी स्वतःच्याच जीवनात व्यस्त होत गेलो.कुठून ती पत्रिका माझ्या माथी आली आणि तिची नजरा नजर झाली.परत झालेल्या दुःखाला हाथ फेरावे असं झालं होतं.पण समोर काय झाले मला कळलंच नाही.

नागपूरला जाऊन स्वतःच्या हिमतीवर शिक्षण घेतलं.माझ्या मागे पुढे कुणी नाही असे गृहीत धरून स्वतःचं जीवनक्रम विकट परिस्थितीत घालवला आणि आज तिथला एक टॉप लेवलचा इंजिनिअर म्हणून माझी ओळख होऊ लागली.कालांतराने आशाचं आणि अमितचा लग्न झाला.पण सगळयांच्या मनातून माझं स्थान कधीच गेलं नव्हतं.जसजशी दिवशे होत गेली. तसं त्यांना कळायला चुकलं होतं.काही काळासाठी स्थिरावलेला विश्वास पुन्हा मनात घर करून

बसला होता.आणि याची सगळयात जास्त तीव्र वेदना आशाला होती.कारण आशाला माझ्या बाबतीत सगळं काही माहीत होतं.

कसं आहे माणूस बदलतो.पण मनातले प्रश्न कधीच बदलत नाही.सगळयांपासून वेगळा झालेला मी आजही त्याचं वाटेवर भटकत होतो.जिथे शेवटचं मयुरिला पाठमोरी जाताना बघितलं होतं.कित्येकदा असं वाटायचं की तिचं मन पालटलं असेल पण असं झालं नाही.वेळ निघत गेला आणि अंतरे वाढत गेली.हृदय आणखी कठोर होत गेली.पण जिव्हाळा नाही संपू शकला.ज्यामुळे नैन धारा आजही ओथंबत होत्या.

## १३) शेवट...

माझ्या पाठमोरी निशाला बघताच मला राग आला.माझ्या मस्तकाची आग शिगेला पोहचली होती.आणि माझ्या आयुष्याची झालेली वाटवळ याची साक्ष होती.पण आज परत तीच माझ्या समोर होती.कसं बघवणार.तिला बघताच मला तिथे थांबण्याचा सगळा इंटरेस्ट संपला होता.आणि ती परत काही बोलणार याच्या आतच मी तिथून जायला लागलो.

शेखर... थांबतोस..

तो आवाज फार ओळखीचा वाटत होता.चक्क दहा वर्षांनी सुद्धा तो आवाज मला तिथे थांबण्यास भाग पाडत होता.अचानक पायाशी काहीतरी घुटमळल्यासारखं वाटलं.म्हणून खाली बघू लागलो...

मी बाहेर जाऊ नये म्हणून पायाला घट्ट आळी मारून बसलेला दुसरा तिसरा कुणी नसून तोच मुलगा होता ज्याला मी शुरुवातीला स्मिताच्या लग्नात आईसक्रीम घेऊन दिले होते.आणि आज त्याची बाबा म्हणून मारलेली प्रेमळ हाक सगळं काही विसरवून जाण्यास भाग पाडत होतं.

क्षणभर मी मयुरीकडे बघितलं.मंद पावले टाकीत ती त्याच्याजवळ आली.आणि त्याला म्हणाली...

आज खोटं नाही सांगायचं बाळ..सांग तुझ्या वडिलांना तू किती वर्षाचं आहेस ते..

मयुरी...आज इतक्या दिवसांनी मी पहिल्यांदा मी तिला हाक मारली होती.तिला हाक मारताना काळीज कसं ठकठक करत होतं..

हो शेखर...आज खरं कळायलाच हवं..कारण त्यादिवशीच्या एका खोट्या गैरसमजुती मुळे दहा वर्षांचा अंतर लागला हा दिवस यायला.एका मुलाला त्याच्या वडिलांना भेटण्यासाठी.एका बायकोला त्याच्या नवऱ्याला भेटण्यासाठी. इतकं अंतर लागलं शेखर..मला माफ कर शेखर..तुझ्या अश्या असण्याला माझीच फार मोठी चूक आहे.

यात तुझी काहीच चुकी नव्हती मयुरी..कारण जे घडलं त्यात प्रत्येकाचीच वेगवेगळी मते होती.तुला एकट्याला दोष देण्यात काहीही अर्थ नाही.काही गोष्टींना मीही कारणीभूत होतो.

जर त्या दिवशी मला ती समज आली असती तर आज हा दिवस दहा वर्षांनी नसता आला शेखर...आणि रडत रडत ती माझ्या खांद्यावर डोकं ठेवून रडायला लागली.ते बघून निशा सामोरी आली आणि म्हणाली..

या सगळयात दोषी असेल तर ती मी आहे तुम्हा दोघांची.कारण त्यावेळेस मला फक्त शेखर हवा होता.शेखर तुझ्यासाठी मी इतकी स्वार्थी झाले होते की मला कळलंच नाही मी काय करते आहे ते?मला फक्त इतकंच वाटले की माझ्या त्या वक्तव्यावर तू तुझं निर्णय बदलवशिल आणि माझ्याशी लग्न करशील.

पण तुझं प्रेम खरं निघालं.मयुरी गेल्यानंतर जेव्हा तू घरी आलास.मला वाटलं तुझं निर्णय ठरलेलं असेल पण तू काहीच न बोलता निघून चालला गेलास.वाट बघितली आज येशील उद्या येशील पण तू आलास नाही.

तेव्हा कळून आलं की मी काय चुकी केली आहे ते.दोन प्रेम करणाऱ्यांना असं अलग करणं म्हणजे किती घोर पाप झालं माझ्या हातून तेव्हा मला कळलं.कितीतरी दिवस ही गोष्ट मनात घर

करून होती.पण कुणा समोर बोलावे हेच काही सुचत नव्हते.पण आज धन्यवाद करते तुझ्या मित्रांना ज्यामुळे आज मी येथे येऊ शकले.

सगळे जण झालेल्या कृत्याची माफी मागू लागले होते.आई वडिलांनी पाणावलेल्या डोळयांनी मला कितीतरी दिवसांची घट्ट मिठी मारली होती.सगळयांचं झाल्यावर माझे पूर्ण मित्र सामोरी आले..जो म्हणाला..

मित्रा खरी चूक आम्हा सगळयांची आहे.प्रासंगिक भावनेत आई वडील वाहत गेले.त्यांच्या बाबतीत ते खरे होते पण इतकी वर्षे आम्ही तुझ्यासोबत राहूनही तुझ्यावर विश्वास करू शकलो नाही.जेव्हा तू आम्हाला सोडून गेलास ना तेव्हा आम्हाला त्याची खात्री झाली होती पण वेळ खूप सामोरी निघून गेली होती.

मग आम्ही ठरवलं.आता जे करायचं ते आता आम्हीच करायचं...शेखरला परत आणायचं...दिग्या म्हणाला..

सगळयात आधी आम्ही मयुरिचा शोध घेण्याचं ठरवलं.कारण तीही तुझ्यासारखीच कुणाला काहीही न सांगता निघाली होती.शेवटी काही प्रयत्नांती रेल्वे स्टेशनवर ती बेशुद्धावस्थेत मिळाली.कारण ते दिवस प्रतिकच्या जन्माचे दिवस होते.आणि मी स्वतः ती डिलिवरी केली होती.मयुरीला ही सगळे त्याच दिवशी सगळं कथन केलं होतं.आणि तिलाही खात्री झाली होती की हे सगळं चुकीचं राहू शकते म्हणून.आशा म्हणाली..

जेव्हा प्रतीक चालायला,बोलायला लागला.स्मिताचि आणि तिची भेट आम्हीच घडवून आणली.जेणेकरून तुझ्या विषयी काही माहिती मिळू शकेल म्हणून.पण तेव्हाही निराशाच आली. सूनैना म्हणाली..

त्यामुळे आम्ही एक बैठक घेतली.आणि सगळयात आधी निशाला रस्त्यात पकडलं..तेव्हा कुठे या सगळया गोष्टींचं उलगडा झाला.पण तुझा पत्ता नसल्यामुळे आम्ही तुझ्यापर्यंत येण्याचा मार्ग शोधत होतो.शेवटी जो ने तुला फेसबुकच्या एका फोटोमध्ये बघितलं.आम्ही मग त्याचा शोध घेतला तेव्हा असं कळलं की तू नागपूरला आहेस.आणि आता इंजिनिअर झाला आहेस.आनंद वाटला पण तुला इथे आणायचं कसं हा विचार चालू होता...अमित बोलला..

तुला काय वाटलं..स्मिताच्या लग्नाची पत्रिका तुझ्या नातेवाईकांनी आणून दिली होती का?.. नाही.ती पण आम्हीच पाठवली होती..कारण तू लग्नाला येशील म्हणून आम्हा सगळयांना माहीत होतं.म्हणून आठ दिवसांच्या आधीच आम्ही मयुरीला स्मिताच्या घरी पाठविले.जेणेकरून तुझी आणि तिची भेट व्हावी म्हणून..आणि आम्ही ठरल्यानुसार तू तिला भेटलास...दिग्या म्हणाला...

तिला बघितल्यावर जेव्हा तू तिथून निघालास...मी तुझ्या मागे मागेच होती.पण तुला निमित्त दाखवण्यासाठी आम्ही गाडीच्या खराबीची करणे सामोरं केली.जेणेकरून इतक्या दिवसांत तुझ्या मनात काय आहे ते दिलखुलासपणे तू मला सांगावे..आणि तू तुझ्या प्रेमात खरा उतरलास..आशा म्हणाली..

जेव्हा तू बोलत होतास...आम्ही सगळेच फोनद्वारे ऐकत होतो..मयुरी पण...पण आम्हाला तसं दाखवायचं नव्हतं.तू परत आमच्यात यावं म्हणून तुला पार्टीला परत बोलावण्यात आलं..कारण आम्हाला तुझी फार आठवण येत होती आणि एकदा तरी तुझ्याशी खूप बोलायचं होतं म्हणून..अमित म्हणाला..

जेव्हा सगळं काही व्यवस्थित झालं.तुला तुझ्या बाबांचं फोन आलं.सॉरी तो बाबांचा नव्हता..मी सारखं डब्बिंग करून बोलत होतो.कारण जर तू लग्नाला नसता आलास तर या बाबा द्वारेच तुला आणायचं हा आमचा दुसरा प्लॅन होता.दिग्या म्हणाला..

आणि आजचा दिवस हा ठरला होता आणि त्यामुळे आम्ही सगळयांनी निशासोबत सगळयांना बोलावलं होतं..

शेवटी सूनैना म्हणाली

हे सगळं बघून मी परत एकदा आवासून मित्रांकडे बघू लागलो..कारण शेवटी मित्र कसेही असले तरी त्यांनीच हे सगळं घडवून आणलं होतं..आणि माझ्या जीवनात जे असे मित्र आहेत म्हणून मला फार गर्व यायला आला होता..

म्हणजे हे सगळं.....मी थोडं आश्चर्यात म्हटलं..

हो आम्हीच घडवलं होतं..सगळे एक सुरत म्हणाले...

अमित ..दिग्या...यार माझ्या मित्रांनो..इतकं सगळं केलं ..माझ्यासाठी..आणि परत डोळयात मैत्रीचे नवे अश्रू घेवून मी त्यांना आलिंगन देऊ लागलो.कारण शेवटी म्हटलंच आहे.फ्रेंडशिप थेन बेटर दॅन लव.मैत्री किती सर्वश्रेष्ठ असते.आज त्याचं ताजं उदाहरण माझ्या डोळयासमोर होतं.

आज पार्टी कोण देणार? अचानक जो म्हणाला...आणि सगळे हसू लागले...

आज इतक्या दिवसांनी अन्नपूर्णा परत एकदा भरली होती.मित्रांची टोळी परत एकदा हसत होती.चायची ऑर्डूर् दिल्या गेली आणि परत एकदा गप्पा गोष्टी रंगू लागल्या.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला शतकांपुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

**मंडळी!**

**वाचायला तर हवंच!**

**पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...**

**...आणि स्वतःही लिहायला हवं.**

esahity@gmail.com

www.esahity.com